


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२८ ■ बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com








केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्र सरकार तर्फे आयुष मंत्रालयाला सर्वात जास्त निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल सरकारचे आभार व्यक्त केले. संपूर्ण जगात आयुष प्रणाली लोकप्रिय होत असल्याचा दावा सुद्धा त्यांनी केला तसेच आयुष पर्यटनाच्या माध्यमातून देशभरारी घेईल. रोजगाराची निर्मिती होईल आणि जडीबुटी ची शेती केल्यानंतर शेतकऱ्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल, अशी माहिती सुद्धा प्रतापराव जाधव यांनी देत या चार दिवसीय राष्ट्रीय आरोग्य शिबिराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.




# गण गणात बोते हा मंत्र मोलाचा - राष्ट्रपती मुर्मू

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोला:** संत गजानन महाराज यांच्या दर्शनाचे मला सौभाग्य प्राप्त झाले. गजानन महाराज यांचे संपुर्ण जीवन समाजकल्याणासाठी समर्पित होते. गण गण गणात बोते हा त्यांचा मंत्र सगळ्यांना समान भावाने पाहण्याचा सल्ला देतो. त्यांची ही शिकवण समाज कल्याणासाठी महत्वाची आहे. राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. या चार दिवसीय आयोजनात लोकांचे आरोग्य जनजागृती होणार आहे. या आयोजनातून लोकांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणार आहे. आयुर्वेद आणि इतर पध्दती मन आणि शरिर स्वस्थ ठेवण्यात मदत करतात असे मत राष्ट्रपती मुर्मू यांनी व्यक्त केले. मी आयुर्वेद पध्दतीने जीवन जगत आहे. आज जंगल जाळले जात आहे. पण, जडीबुटी जळत आहे या विषयी राष्ट्रपतींनी चिंता व्यक्त केली. मेडिसन प्लँट उगविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज राष्ट्रपतींनी व्यक्त केली. स्वस्थ भारत आणि सशक्त भारत निर्माणासाठी प्रत्येकाने सहभाग नोंदविण्याचे आवाहन राष्ट्रपतींनी केले.

स्वस्थ भारत आणि स्वच्छ भारताची आज शेगाव येथील संत नगरीतून राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या माध्यमातून सुरुवात होत आहे. हा एक आनंदाचा क्षण असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केले. आयुष मंत्रालयातर्फे संत नगरी शेगाव मध्ये आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन झाले. उपस्थिताना संबोधित करताना राष्ट्रपतींनी म्हटले की आयुर्वेदाला पुन्हा एकदा जगात सर्वोच्च स्थान देण्यासाठी आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून केंद्र सरकार जे प्रयत्न करीत आहे ते खरोखरच कौतुकास्पद आहेत. आयुष बाबत अधिक जनजागृती करावी लागेल. आज आपल्या देशात जंगलांमध्ये जडीबुटीं मोठ्या प्रमाणात आढळतात. परंतु जंगले तोडली जात आहेत जाळली जात आहेत. त्यामुळे या दुर्मिळ जडीबुटींचा नाश होत आहे. आयुर्वेद वाचवायचे असेल तर या जडीबुटींची शेती करण्यासाठी प्राधान्य द्यावे लागेल तरच सर्व संतु निरामय चा संदेश आपण जगाला देऊ शकू. जरी युनानी आणि होमिओपॅथी बाहेरून आले तरी त्यांचा विकास मात्र भारतातच झाला असल्याची माहिती राष्ट्रपतींनी दिली. संत गजानन महाराजांच्या पवित्र भूमीत येण्याचे भाग्य मला लाभले, त्यांच्या दर्शनाचा लाभ मला मिळाला. संत गजानन महाराजांचा गण गण गणात बोते हा मंत्र सर्वांनाच लाभदायी असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी व्यासपीठावर राज्यपाल आचार्य देवव्रत, आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार व आयोजक प्रतापराव जाधव, युवा क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री मकरंद पाटील, आमदार संजय कुटे, वैद्य देवेंद्र त्रिगुणा, राकेश शर्मा, आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. आशुतोष गुप्ता आदींची उपस्थिती होती. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना संत गजानन महाराजांची प्रतिमा देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. राष्ट्रपतींच्या हस्ते रिमोट कंट्रोल द्वारे राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले, आयुष मंत्रालयाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने घेतल्याचे प्रमाणपत्र सुद्धा राष्ट्रपतींना देण्यात आले यानंतर राष्ट्रपतींच्या हस्ते आयुर्वेदाच्या प्रचार आणि प्रसारासाठी आपले आयुष्य वाहून घेतलेल्या पद्मश्री वैद्य देवेंद्रजी त्रिगुणा, डॉक्टर मनीषा कोठेकर, डॉक्टर आशुतोष गुप्ता, वैद्य प्रियम वारियर, वैद्य रामदास आव्हाड यांना जीवनगौरव पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुद्धा आपल्या भाषणात भारताच्या या प्राचीन आयुर्वेदिक प्रणाली बद्दल योग्य माहिती देत आयुर्वेद पद्धतीला सर्वांनी जास्तीत जास्त अंगीकार करण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले.







CLASSIFIED

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

**सिध्दार्थ वधू-वर सूचक केंद्र**

मुला-मुलींचे तसेच घटस्फोटीत यांची नाव नोंदणी करण्यात येईल. याची फी ५०० रुपये राहील. (फक्त बौध्द समाजातील मुला-मुलींकरीता)
-:संपर्क:-
सिध्दार्थ दामोधरे अमरावती
मो.9545000880

**तार फेन्सींग**

तार फेन्सींग प्लॉट व शेतीला वाजवी दरात करुन मिळेल.
२० वर्षाचा अनुभव
----संपर्क----
R.R.Construction
9860828949

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

# मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी सुटीच्या दिवशीही कार्यालय सुरू

- ऑनलाईन कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना ३ टक्के सूट
- आर्थिक वर्षात महापालिका प्रशासनाने सुरु केले कर वसुली अभियान

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोला:** महानगरपापलिका प्रशासनाव्दारा शहरातील नागरिकांना त्यांचे थकित मालमत्ता कराचा भरणा करणे आर्थिक दृष्ट्या सोईचे व्हावे याकरिता दि. १४ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत तीन टप्प्यात सुरू करण्यात आली आहे. तसेच मालमत्ता धारकांना कराचा भरणा करणे अधिक सोईचे व्हावे यासाठी शनिवार, रविवार आणि सुटीच्या दिवशीही चारही झोन कार्यलय हे सुरू राहणार आहे.

शहरातील मालमत्ता धारकांनी आपला कराचा भरणा ऑनलाईन प्रणालीव्दारे केल्यास त्यांना सामान्य करात ३ टक्के अतिरिक्त सूट देण्यात येणार आहे. शास्ती अभय योजनेचे टप्पा एक मध्ये १४ फेब्रुवारी ते ५ मार्च असून यात या कालावधीत थकित कराचा भरणा केल्यास शास्तीच्या रकमेत १०० टक्के सूट मिळेल. तर टप्पा दोन मध्ये ६ मार्च ते २० मार्च या कालावधीत थकित कराचा भरणा केल्यास शास्तीच्या रकमेत ९० टक्के सूट मिळेल. तर तिसऱ्या टप्प्यात २१ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत थकित कराचा भरणा केल्यास दंड अर्थात शास्तीच्या रकमेत ८५ टक्के सूट मिळणार आहे. नागरिकांनी याची नोंद घेऊन या संधीचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने आणि उपायुक्त विजय पारतवार यांनी केले आहे.

## लग्नसराईत सोन्या-चांदीच्या दरात मोठी हालचाल !

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेमुळे मौल्यवान धातूंच्या किमतींमध्ये वाढ होत आहे. अमेरिका आणि इराणमधील वाढत्या युद्ध संकटामुळे, गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा सोने आणि चांदीकडे, सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी आज, म्हणजेच २५ फेब्रुवारी रोजी सोने आणि चांदीच्या किमतीही मजबूत झाल्या. भारतात सध्या लग्नसराईचा सुरू आहे आणि याच काळात सोने आणि चांदीच्या किमतींमध्ये लक्षणीय चढ-उतार होत आहेत. कधी खाली तर कधी वर असे सोन्या चांदीचे दर आहेत. एमसीएक्सवर, सोन्याचा भाव सुमारे०.५४ऽ वाढून प्रति १० ग्रॅमसाठी १ लाख ६० हजार ८३३ वर पोहोचला आहे.

# भीषण अपघातात चौघे ठार

## मळसुरच्या पायघन कुटुंबावर काळाचा घाला









प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**पातूर:** अहिल्यानगरमध्ये कार आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी आहे. अहिल्यानगर-दौंड राष्ट्रीय महामार्गावर कोळगाव शिवारातील माऊली मंदिराजवळ मंगळवारी घटना घडली. अपघातात पातूर तालुक्यातील एकाच कुटुंबातील आई-वडील आणि मुलासह तिघे आणि चालकाचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी पहाटे ट्रक आणि इको कार यांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात इको गाडीचा चालक नितीन अनिल कोकाटे (वय २२, रा. काष्टी) यांच्यासह गाडीत प्रवास करणारे गजानन जनार्धन पायघन (४७), दुर्गा गजानन पायघन (३६) आणि त्यांचा मुलगा वैभव गजानन पायघन (१९) यांचा जागीच मृत्यू झाला. तर करण गजानन पायघन (१३) हा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

पायघन कुटुंब मूळचे अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील मळसुर गावचे असून, कामानिमित्त ते सध्या श्रीगोंदा तालुक्यातील चिंभळे येथे वास्तव्यास होते. मंगळवारी पहाटे ते गावाकडून चिंभळेकडे येत असताना कोळगाव शिवारात दौंडकडून नगरकडे जाणाऱ्या ट्रकने त्यांच्या इको कारला समोरून जोरदार धडक दिली.

# शिवभोजन चालकांना सरकारचा मोठा दिलासा

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**मुंबई:** राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. आज अधिवेशनाचा तिसरा दिवस आहे. दरम्यान काल दुसऱ्या दिवशी राज्यपालांचे अभिभाषण पार पडले. या भाषणावर बोलताना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी जोरदार हल्ला चढवला होता. राज्यपाल सरकारच्या नादाला लागून खोटे बोलले, अशी टीका भास्कर जाधव यांनी केली होती.

निवडणुकीच्या पूर्वी हे पक्ष जय भीम-जय मीम म्हणतात पण निवडणुकीनंतर फक्त जय मीमच राहते ते आमच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विसरतात. संविधानाच्या कुठल्या पानावर मनपामध्ये नमाज पठण परवानगी आहे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या संविधानात कुठे परवानगी आहे याचे कागद त्यांनी मला दाखवावे, असे म्हणत मंत्री नीतेश राणे यांनी मालेगाव मनपामध्ये नमाज पठणावर टीका केली आहे. मुंबईत हवेची गुणवत्ता खालावल्याचा मुद्दा आमदार अनिल परब यांनी उपस्थित केला. त्यावर, मुंबईत बांधकामाच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करू, असे पंकजा मुंडे यांनी सांगितले. यासंदर्भातली आकडेवारी किती तथ्याधारित आहे ते पडताळून पाहायला हवे, असेही त्या म्हणाल्या.त्यावर मुंबईत सुरू असलेल्या सर्व बांधकामांवर देखरेख ठेवण्यासाठी इंटरनेट ऑफ थिंग्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने एक व्यवस्था तयार करण्याचे आदेश, बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत आणि त्याची लवकरच अमंलबजावणी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत दिली.शिवभोजन योजनेसाठी ५५ कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केली असून शिवभोजन योजना पुन्हा सुरळीतपणे सुरू होणार राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांची माहिती दिली आहे. प्रलंबित देयके आणि खर्चासाठी पुरवणी मागण्यांमध्ये निधी मंजूर करून १५० कोटी निधीची गरज असताना ७० कोटी चालू आर्थिक वर्षात मंजूर निधी तर, ५५ कोटींची पुरवणी मागणी सादर केली आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी किडनी विकवी लागल्याचा प्रकार समोर आला होता. यावर लक्षवेधी सूचना अतुल भातखळकर यांनी उपस्थित केली होती त्यावर विजय वडेट्टीवार, अर्जुन खोतकर, योगेश सागर यांनी उपप्रश्न विचारले.विजय वडेट्टीवार म्हणाले, जवळपास १९ शेतकऱ्यांना किडनी विकावी लागली असून, किडनी विकायला लावणाऱ्या सावकारांवर मकोका लावण्यात यावा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. या रॅकेटचा सूत्रधार दिल्लीतील पद्मश्री मिळालेल्या डॉक्टरला महाराष्ट्र पोलिस अटक करणार का? असा सवालही वडेट्टीवार यांनी सभागृहात केला.

## जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही- रोहित पवार

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**मुंबई:** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावरून पुन्हा एकदा खळबळजनक दावा केला आहे. या प्रकरणात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने संबंधित विमान कंपनीला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत, आता याप्रकरणी आपण FIR दाखल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. रोहित पवारांच्या दाव्यानुसार, २८ जानेवारी रोजी ३ऽर्ऀ ने दुपारी १:३६ वाजता एक अहवाल प्रसिद्ध केला होता. या अहवालाद्वारे 'व्हीएसआर व्हेंचर्स' कंपनीला आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांना क्लीन चिट देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला.

## शरद पवार यांच्या राज्यसभेसाठी सुप्रिया सुळेंची संजय राऊतांशी चर्चा

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**मुंबई:** अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी सखोल आणि पारदर्शक चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे. रोहित पवार यांनी या प्रकरणात उपस्थित केलेल्या मुद्द्यांमध्ये तथ्य असेल, तर त्याची गांभीर्याने चौकशी झालीच पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

रोहितने अभ्यासपूर्वक पाठपुरावा केला असून त्याचा मला अभिमान वाटतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. अजित पवारांच्या अपघातामागील सत्य समोर यावे, हीच आमची अपेक्षा आहे. कोणतीही शंका राहू नये म्हणून तपास प्रक्रिया पारदर्शक असणे अत्यावश्यक असल्याचे सुळे यांनी नमूद केले.

राज्यसभेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी संसदेत जावे, अशी सर्वांची अपेक्षा असल्याचेही सुळे यांनी नमूद केले.

यासंदर्भात त्यांनी महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना नेत्यांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले. अनिल देसाई आणि संजय राऊत यांच्याशी त्यांनी संपर्क साधला असून, संजय राऊत यांच्याशी चर्चा झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पवार साहेबांशी सर्वांचे प्रेमाचे नाते आहे आणि ते राज्यसभेत असावेत, अशी भावना अनेकांच्या मनात आहे, असे सुळे म्हणाल्या. या सर्व घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात नवे समीकरणे तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अनुसूचित जातीसाठी मोफत तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण

**अमरावती :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या वतीने अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक-युवतींसाठी मोफत अनिवासी तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सुशिक्षित बेरोजगारांना स्वतःचा रोजगार सुरू करता यावा, या उद्देशाने हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासाठी २७ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावे लागणार आहे. या उपक्रमांतर्गत किमान दहावी पास उमेदवारांसाठी १ महिना कालावधीचा डिजिटल फोटोग्राफी आणि व्हिडिओ शूटिंग आणि पदवीधर उमेदवारांसाठी २ महिने कालावधीचा अप्लाईड आर्टीफिशिअल इंटेलिजेंस विथ एम्फासिक ऑन रोबोटीक्स आणि आयओटी हे दोन कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यात अभियांत्रिकी, एसीए, बीसीए आणि बीएससी पदवीधर यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रशिक्षणात उद्योजकीय कौशल्याचे प्रशिक्षणात देण्यात येणार आहे.

# दर्यापूर केंद्रात अवतार मेहेरबाबांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा...!

## शोभायात्रेने दर्यापूर नगरी दुमदुमली

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**दर्यापूर:** अवतार मेहेरबाबा आध्यात्मिक केंद्र दर्यापूरच्या वतीने अवतार मेहेरबाबांचा १३२ वा जन्मोत्सव कार्यक्रम आज पहाटे पाच वाजता मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

जन्मोत्सवाच्या कार्यक्रमानंतर सकाळी निघालेल्या अवतार मेहेरबाबांच्या प्रतिमेच्या शोभायात्रा रॅलीने दर्यापूर नगरी दुमदुमून निघाली. दर्यापूरसह अमरावती परतवाडा, कांडली, धामणगाव रेल्वे, व संपूर्ण जिल्ह्यात आज अवतार मेहरबाबांचा जन्मोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला.

दर्यापूर केंद्रात करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये सकाळी चार वाजता, जन्मोत्सव दीपोत्सव, करण्यात आले, त्यानंतर मेहेर नाम जप, मेहेर धून, करून पहाटे पाच वाजता मेहेर बाबांच्या नावाचा जयजयकार करून बाबा प्रेमींनी जन्मोत्सव साजरा केला.

यावेळी ठाणे जिल्ह्यातील सौ मेहेर कृपा पालवे यांचे अवतार मेहरबाबांच्या जीवनावर वार्ता संपन्न झाली.त्यानंतर प्रार्थना, आरती, दर्शन व प्रसादाचा कार्यक्रम पार पडला. दर्यापूर नगरी म्हणून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

तसेच उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे रुग्णांना दूध बिस्किट, फळे वाटपही करण्यात आले. अपंग व गरीब लोकांना कपडे वाटप व भोजन देण्यात आले. दुपारी बारा वाजता अवतार मेहेर बाबा केंद्रात महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला हजारो बाबा प्रेमींची उपस्थिती होती. जन्मोत्सव कार्यक्रमादरम्यान १९ फेब्रुवारी २५ फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमही मोठ्या उत्साहात पार पडले.





# संविधान जागृती प्रश्नमंजूषा उपक्रमात न्या. एम. एस. जावळकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष अॅड. धर्मपाल मेश्राम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या उपक्रमांतर्गत ऑनलाईन संविधान प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आयोजित विशेष सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश न्या. एम. एस. जावळकर (नागपूर खंडपीठ) यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या पुढाकारातून आयोजित संविधान जागृती प्रश्नमंजूषा २०२५-२६ या राज्यव्यापी उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. संविधानाबद्दल सखोल ज्ञान, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि सामाजिक न्यायाची बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.

या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूर येथील डॉ. कैलास वसावे, डॉ. दिविता कोठेकर, डॉ. आरती तायडे, डॉ. व्ही. पी. तिवारी तसेच महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी मुंबई येथील डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. अमोल चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. न्या. श्रीमती एम. एस. जावळकर यांनी विद्यार्थ्यांना संविधान विषयक अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. या विशेष सत्रात न्या. आर. सी. चव्हाण, न्या. पृथ्वीराज चव्हाण, माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित तसेच माजी आयुक्त समाज कल्याण इ. झेड. खोब्रागडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाल अ. थुल यांनी केले. कार्यक्रमास डॉ. जगदीश खोब्रागडे, डॉ. साहिली सुरजुसे व डॉ. आरती तायडे यांची उपस्थिती लाभली. विशेष म्हणजे राज्यातील विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला.

# गोपाल नगर येथील अंडरपासच्या पुलाची सुनील राणा यांनी केली पाहणी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती :** अमरावती – आ.रवि राणा यांच्या निर्देशानुसार गोपाल नगर येथील अंडरपास पुलाच्या कामाची पाहणी युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन केली. यावेळी नगरसेविका सुमती ढोके, रेल्वे विभागाचे कंत्राटदार हुसैन, रेल्वेचे संबंधित अधिकारी तसेच महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

गोपाल नगर परिसरातील नागरिकांकडून अंडरपास पुलाच्या अपूर्ण कामांबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत होत्या. विशेषतः पुलाच्या बाजूला असलेला पोच मार्ग, अंडरग्राऊंड विद्युत केबल टाकण्याचे काम, साईड नाल्यांची बांधकामे तसेच पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या समस्येबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर सदर पाहणी दौरा आयोजित करण्यात आला.

सुनिल राणा यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाचा सविस्तर आढावा घेतला व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. पोच मार्ग व्यवस्थित व सुरक्षित पद्धतीने तयार करण्यात यावा, अंडरग्राऊंड विद्युत केबलचे काम वेळेत पूर्ण करावे तसेच साईड नाल्यांची कामे दर्जेदार पद्धतीने करून पावसाळ्यापूर्वी पूर्णत्वास न्यावीत, असे त्यांनी सांगितले. कामात कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.नगरसेविका सुमती ढोके यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्या मांडत अंडरपास परिसरातील प्रकाश व्यवस्था, स्वच्छता व वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली.

# विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विद्यार्थ्यांचा योग व निसर्गोपचार अभ्यास दौरा

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत येणा-या पी. जी. डिप्लोमा इन योग थेरपी या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता हरिद्वार येथे अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले आहे दि. २४ फेब्रुवारी ते ०२ मार्च या कालावधीत सदर आयोजित करण्यात आला असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून योग व निसर्गोपचार पध्दतीचे सखोल ज्ञान मिळावे, या उद्देशाने या अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले आहे.

अभ्यास दौ-यादरम्यान हरिद्वार येथील गायत्री शक्तीपीठ, देव संस्कृती विश्वविद्यालय, परमार्थ निकेतन येथे भेट देऊन विविध आध्यात्मिक आणि शैक्षणिक अशा विविध प्रकारचे शिक्षण, साधना तसेच संशोधनकार्य करता येते. देव संस्कृती विश्वविद्यालय, हरिद्वार येथे योग, ध्यान, वेद, संस्कृत, अध्यात्मिक विज्ञान, भारतीय तत्त्वज्ञान आणि आयुर्वेद शिकण्याचे ठिकाण आहे. परमार्थ निकेतन ऋषिकेश येथे योग, ध्यान, पर्यावरण संवर्धन व गंगा आरती यासारख्या सांस्कृतिक उपक्रमांचा अभ्यास करण्याकरिता प्रसिध्द आहे.

गायत्री शक्तीपीठ येथे गायत्री मंत्र, यज्ञशास्त्र, आध्यात्मिक साधना आणि समाजसेवेवर आधारित जीवन तत्त्वज्ञान शिकता येईल. ही ठिकाणे भारतीय संस्कृती व अध्यात्मिक शिक्षणाचा अनमोल ठेवा जपणारी आहेत. या ठिकाणी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना अद्यावत ज्ञानाबरोबरच संशोधन व विकासासाठी प्रेरणा मिळेल आणि विद्यार्थी रोजगाराभिमुख होऊन स्वतःचे स्वयंरोजगारासाठी तयार होतील. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांची प्रेरणा व विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनात पी जी डिप्लोमाइन योग थेरपी या अभ्यासक्रमाच्या समन्वयक प्रा. राधिका खडके तसेच प्रा. आदित्य पुंड, डॉ. अनघा देशमुख यांच्या नेतृत्वात या अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले आहे.

# शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. २६ फेब्रुवारी ते दि. १२ मार्चच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.


# महानगरपालिकेच्या जनसंवाद कार्यक्रमात २६२ तक्रारी!

## १०८ जागीच निकाली, ४ करप्रकरणांची शुक्रवारी सुनावणी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती :** महानगरपालिकेत मंगळवारी जनसंवाद व समस्यानिवारण कार्यक्रम महिला आयुक्त सौम्या शर्मा यांच्या उपस्थितीत पार पडला. नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावत विविध समस्या मांडल्या.

या कार्यक्रमात एकूण २६२ तक्रारी दाखल करण्यात आल्या. त्यापैकी १०८ तक्रारी जागीच निकाली काढण्यात आल्या, तर १५४ तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागाकडे पाठविण्यात आल्या.



दाखल तक्रारींपैकी १०९ तक्रारी कर (टॅक्स) संदर्भातील होत्या. त्यातील ४ प्रकरणांची सविस्तर सुनावणी येत्या शुक्रवारी होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. नागरिकांच्या समस्या थेट आयुक्तांसमोर मांडण्याची संधी मिळाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले. प्रशासनाने उर्वरित तक्रारींचे लवकरात लवकर निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

# मेळघाटातील मनरेगा मजुरांच्या खात्यात २८ कोटी जमा!

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती :** होळीनिमित्त राज्यातील मनरेगा मजुरांसाठी ६७ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यातील २८ कोटी ३९ लाख रूपयांचा निधी मेळघाटसाठी आज उपलब्ध झाला आहे. हा निधी मजुरांच्या खात्यात तातडीने जमा करण्यात आला आहे.

होळीनिमित्त आदिवासींना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना मजुरी अदा करण्यासाठी ६७ कोटींचा निधी मंजूर केला. याची देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली. त्यानुसार आज मजुरीची रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकुशल मजुरांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. मेळघाट या आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये मजुरांना काम देताना वाढीव लेबर बजेट मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्यामुळे काही कालावधीपासून मजुरी अदा करणे प्रलंबित होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन मजुरांची मजुरी तातडीने जमा केली आहे. मजुरीचा निधी तातडीने मिळावा, यासाठी मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांनीही याबाबत पाठपुरावा केला आहे.

# अपहरण गुन्ह्यातील अल्पवयीन मुलीला केले आईच्या स्वाधीन !

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती :** पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर येथे दिनांक १६.०२.२०२६ रोजी फिर्यादी वय ५० वर्षे, रा. बहलोलपूर, अमरावती यांनी पो स्टे राजापेठ येथे येऊन फी ची अल्पवयीन मुलगी १७ वर्षे, रा. बहलोलपूर, अमरावती ही होप हॉस्पिटल, राजापेठ, अमरावती येथून कोणालाही काहीही न सांगता निघून गेल्याने फिर्याद दिली वरुन अप क्र.९५/२०२६ कलम १३७(२) भान्यास नुसार अज्ञात इसमाविरुद्ध अपहरण चा गुन्हा दाखल केला. यानंतर वपोनि पुनित कुलट यांनी या गुन्ह्याचा तपास पोउपनि विपुल हुलावळे यांना दिला. सदर तपासाचा तांत्रिकदृष्ट्या उलगडा केला असता सदर अल्पवयीन मुलगी ही कोईबतुर, तामिळनाडू येथे आहे अशी माहिती मिळाली. यानंतर वपोनि कुलट यांनी पोउपनि विपुल हुलावळे, पोशि प्रशांत बेलोरकर, बन ७३३, मपोशि भाग्यश्री पाळवदे, बन १८९७ असे तपास पथक नेमून कोइंबतूर, तामिळनाडू येथे रवाना केले. अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष रा. बेहलोलपुर अमरावती हिचा शोध कोईबतुर, तामिळनाडू येथे घेतला असता तिला पोलीसांची चाहुल आल्याने ती तेथुन पळुन गेली. त्यानंतर पुन्हा तांत्रिक तपासाद्वारे असे अवगत झाले की अल्पवयीन मुलगी ही तिरुचिरापल्ली, तामिळनाडु येथे चेन्नई एग्नोर एक्सप्रेस ने जात आहे. यावरुन तपास पथकाने तिरुचिरापल्ली, तामीलनाडु येथील उेंझ पोलीस यांच्याशी ताबडतोब संपर्क साधून सदर अल्पवयीन मुलगी हीचे फोटो पाठवून तिला ताब्यात घेण्यास सांगितले. यावरून GRP पोलिस, तिरुचिरापल्ली, तामिळनाडु यांनी अल्पवयीन मुलगी हिला ताब्यात घेतले वरुन तपास पथकने तिरुचिरापल्ली, तामिळनाडु येथे पोहचुन अल्पवयीन मुलीची विचारपूस केली असता तिने सांगितले की, आई सोबत झालेल्या भांडणाच्या रागातून होप हॉस्पिटल, राजापेठ येथून निघून गेलेली. यानंतर अल्पवयीन मुलगी हिला चाईल्ड वेलफेअर कमिटी तिरुचिरापल्ली, तामिळनाडु येथे सादर करुन दिनांक २२/०२/२०२६ रोजी तपास पथक राजापेठ पोलीस स्टेशन अमरावती येथे घेवून हजर झाले व अल्पवयीन मुलगी हिला तिची आई यांच्या ताब्यात सुखरुप देण्यात आले. सदरची कारवाई. पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त परिमंडळ ०२ श्याम घुगे, सपोआ कैलास पुंडकर राजापेठ विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक विपुल हुलावळे यांच्या नेतृत्वात पोउपनि मिलिंद हिवरे, पोउपनि अमित बकातवार, पोशि प्रशांत बेलोरकर बनं ७३३, मपोशि भाग्यश्री पाळवदे बनं. १८९७ तसेच सायबर पोलीस स्टेशन चे मपोशि सुषमा आठवले, बनं. ७१४ यांनी केली आहे.

# खामगावातील जनता दरबारात करवाढीला 34 संघटनांचा विरोध !

## अवास्तव करवाढीला स्थगिती देणार; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची ग्वाही !

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**खामगाव :** खामगाव नगरपरिषद क्षेत्रातील अवास्तव करवाढीच्या विरोधात मंगळवारी आयोजित जनता दरबारात तब्बल ३४ संघटनांनी विरोध दर्शविला. दरम्यान, जनता दरबारात केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी नागरिकांचा रोष राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः संपर्क साधत करवाढीला स्थगिती देण्याचे आश्वासन दिले. करवाढीच्या मुद्द्यावर नागरिकांमध्ये वाढलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. मंगळवारी खामगाव येथे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत जनता दरबारात करवाढीचा मुद्दा तीव्रतेने उपस्थित करण्यात आला. जनता दरबार सुरू असतानाच प्रतापराव जाधव यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र ते बैठकीत व्यस्त असल्याने संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर जनता दरबार आटोपल्यानंतर शिंदे यांनी स्वतः संपर्क साधून परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली आणि करवाढीला स्थगिती देण्याची ग्वाही दिली. करवाढ रद्द झाल्यास नागरिकांना दिलासा मिळण्याची आशा आहे.जनता दरबारात खामगावकर व विविध मान्यवरांनी करवाढी विरोधात नाराजी व्यक्त केली. शहरात रेल्वे व इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या असताना महानगरांच्या तुलनेत करवाढ का, असा सवाल ॲड. कुणाल राठी यांनी उपस्थित केला. डॉ. भावेश चव्हाण यांनी करवाढीचे दीर्घकालीन दुष्परिणाम होतील, अशी भीती व्यक्त केली. डॉ. राजेश राजोरे यांनी करवाढ राक्षसी स्वरूपाची असल्याचे सांगितले, तर ॲड. अमोल अंधारे यांनी आंदोलनाचा इशारा दिला. माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनीही लढा उभारण्याची भूमिका मांडली.खामगाव नगरपरिषदेत प्रशासकांच्या कार्यकाळात करवाढ करण्यात आली. या कर वाढीविरोधात वकील संघ, व्यापारी, व्यावसायिक तसेच सामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.या बैठकीला माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, संतोषसेठ डिडवाणी, नरेंद्र संचेती, कुंजू नोवाल, अड. अमोल अंधारे, राजेंद्र बघे व डॉ. राजेश राजोरे यांची उपस्थिती होती. यावेळी सरस्वती खासने, अमेय सानंदा, आनंद गायगोळ, चेतन ठोंबरे यांच्यासह आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून राणीघाट अपघातातील जखमींची विचारपूस

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती :** धारणी तालुक्यातील राणीघाटामध्ये झालेल्या अपघातातील पाच जखमींना जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या जखमी आणि त्यांच्या नातेवाईकांची जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी भेट घेऊन अपघात आणि प्रकृतीची माहिती घेतली. तसेच जखमींवर योग्य उपचार करण्याची सूचना केली.यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार आदी उपस्थित होते. अपघातामधील अर्चना दारासिंगे, रा. कंजोली, गेरुबाई देवळे, रा. मोठेखेडे, रिता राठोड, रा. सिनंबद, देवा धांडे, रा. कंजोली, मुनी दहीकर, रा. कंजोली, विकेश दहीकर, सालाई, सर्व ता. धारणी यांना जिल्हा सामान्य रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# विद्यापीठात चित्रकला व रांगोळी स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित चित्रकला व रांगोळी स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पकता आणि कलात्मक अभिव्यक्तीला वाव मिळाला. विविध सामाजिक, पर्यावरणीय, राष्ट्रीय तसेच सांस्कृतिक विषयांवर आधारितचित्रे आणि आकर्षक रांगोळ्यांमधून विद्यार्थ्यांनी आपली कलात्मक दृष्टी प्रभावीपणे सादर केली. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी रंगसंगती, मांडणी आणि संदेशात्मकतेचा उत्कृष्ट संगम साधत आपले कौशल्य दाखविले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वैशाली गुडधे होत्या. . कार्यक्रमाचे उद्घाटन शशिकांत रोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. श्रीकांत पाटील व डॉ. प्रेमानंद तिडके यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. स्पर्धेचे परीक्षण प्रा. श्रावस्ती सर आणि प्रा. बुरंगे सर यांनी केले. प्रत्येक कलाकृतीचे सूक्ष्म निरीक्षण करून कल्पकता, सादरीकरण, विषयाची सुसंगती आणि सौंदर्यदृष्टी यांचा विचार करून उत्कृष्ट कलाकृतींची निवड केली. अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत डॉ. वैशाली गुडधे यांनी व्यक्त केले मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक करत उपक्रमांचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ढोरे मॅडम यांनी, तर आभार डॉ. श्रीकांत पाटील यांनी मानले.स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कलात्मक क्षमतांचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागून त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाला निश्चितच चालना मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



**NAME CHANGE**

I have change my name from **PRUTHA PRBHUDAS SHENDE** (As per old passport name/wrong name) To **PRUTHA PRABHUDAS SHENDE** (New name as on two photo id) Passport - T8735799 Address - Yugandhar, Opp Nirmal Sweets, Gaurakshan Road, Income Tax Chauk, Kothari Layout, Akola, 444 001, Maharashtra (India)

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# खंडणीसाठी खोट्या फिर्यादींचा सुळसुळाट ?

## ♦ स्वयंघोषित पत्रकाराचा काळा कारनामा उघड

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोट :** अकोट शहरात पत्रकारितेच्या नावाखाली खंडणी उकळण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, एका स्वयंघोषित 'पत्रकारा'ने खोट्या फिर्यादी देत विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्याचा सपाटा लावल्याची माहिती समोर आली आहे. पैसे मिळाले नाहीत तर अशाच प्रकारचे गुन्हे दाखल करीन, अशी उघड धमकी देत संबंधितांकडून पैशांची मागणी करण्यात येत असल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात राजकीय वजन असलेल्या लोकप्रिय नेत्याविरुद्ध तसेच एका पत्रकाराविरुद्ध खोटी फिर्याद देऊन गुन्हे दाखल करण्यात आले होते. एवढेच नव्हे तर शहरातील एका नामांकित बिल्डरवरही गंभीर स्वरूपाचे आरोप करत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र संबंधितांनी दबावाला बळी न पडता थेट पोलीस कारवाईला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला.

पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करत सर्व बाजूंनी तपास केला. तक्रारीतील तथ्यांची पडताळणी, संबंधितांचे जबाब, पुरावे आणि परिस्थितीजन्य बाबींचा अभ्यास केल्यानंतर दिलेली फिर्याद ही खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी 'दूध का दूध, पाणी का पाणी' करत सत्य बाहेर आणले आहे.

या पार्श्वभूमीवर खोटी फिर्याद देणे, खंडणीचा प्रयत्न करणे व धमकी देणे या गंभीर बाबींवर संबंधित स्वयंघोषित पत्रकाराविरुद्ध कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शहरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू असून, पत्रकारितेच्या नावाला लागलेला हा काळा डाग मानला जात आहे. दरम्यान, नागरिकांनी अशा प्रकारच्या दबावतंत्राला बळी न पडता थेट पोलिसांकडे तक्रार करावी, असे आवाहनही सुज्ञ नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अंजनगाव– अकोट महामार्गावर एसटी बस व कारचा अपघात, एक ठार सहा जखमी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी




**आकोट :** अंजनगाव महामार्गावरील भंडाराज येथे २४ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजताच्या दरम्यान एसटी बस व कारचा अमोरा समोर अपघात होऊन एकाचा जागीच मृत्यू झाला असून सहा जन गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

अंजनगाव सुर्जी येथून आकोट कडे जाणाऱ्या राज्यमहामार्ग क्र ५७२ वरील भंडारज येथे दुपारी चार वाजता एसटी महामंडळाची बस क्रमांक एम एच २० जी सी ३९३२ ही बस आकोट कडे जात असताना समोरून भरधाव येणारी कार क्रमांक एम एच २७ जी ई ८०८१ ची भीषण आमोरासमोर टक्कर होऊन यामध्ये कारचालक शालिग्राम वानरे वय ६० यांचा जागीच मृत्यू झाला असून या कारमधील नुकतेच लग्न झालेले प्रथमेश वानरे वय ३० , उत्कर्षा वानरे ( कडू ) वय २७ जखमी झाली असून त्याच कारमधील कुसुम वानरे वय ६० , रुखमाबाई गवई वय ७०, सर्व राहणार अकोट हे गंभीर जखमी झाले असून त्यांना अंजनगाव ग्रामीण रुग्णालयातून उप जिल्हा ग्रामीण रुग्णालयाकडे अचलपूर येथे पुढील उपचाराकरिता पाठवण्यात आले आहे. तर परिवहन महामंडळाच्या बस मध्ये जखमी झालेले वंदना पिंपळकर वय ३५, रमेश रामचंद्र पिंपळकर वय ७० रा अचलपुर हे सुद्धा गंभीर जखमी झाले असून पुढील उपचारासाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

अपघाताची भीषणता एवढी प्रचंड होती की कारच्या समोरचा भाग व एसटी बसचा समोरील भागाचा चेंदामेंदा झाला. भंडारज रोडवर हा भीषण अपघात घडताच या गावातील ग्रामस्थ मदत करण्यासाठी धावून आले . तातडीने गंभीर जखमींना अंजनगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांनी तातडीने जखमी रुग्णांवर उपचार सुरू केले. अंजनगाव आकोट या राष्ट्रीय महामार्गावर भंडाराज जवळील एका पुलासमोरील रस्ता दबल्यामुळे भरधाव असलेल्या वाहनांचे नियत्रण सुटून नेहमी अपघात होत असून या मार्गाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी करून मधोमध रोडचा दबलेला भाग सिमेंट काग्रेटने बुजून टाकणे गरजेचे आहे. त्यामुळे पुन्हा अपघात होणार नाही.

## जिल्ह्यात ७ ठिकाणी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्ह्यातील ७ गावांत प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यात येणार असून, त्यासाठी नवीन दर्जेदार प्रशिक्षण संस्थांची निवड प्रक्रिया सुरू आहे. हातगाव (मुर्तिजापूर), आलेगाव (पातूर) चोहट्टा, मुंडगाव, (अकोट), हिवरखेड, मालेगाव (तेल्हारा) व वाडेगाव (बाळापूर) या ठिकाणी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्यात येणार आहेत. कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतर कमी व्हावे यासाठी ग्रामीण भागात ठप्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रठ ही योजना राबवली जाते. पात्र व इच्छूक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. प्रस्तावाचा विहित नमुना, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत दुसरा माळा, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे उपलब्ध आहे.

## टीएमएस २.० : जनआरोग्य योजनेच्या लाभासाठी अद्ययावत प्रणाली

**अकोला :** आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत जलद, पारदर्शक आणि रुग्णस्नेही उपचार मिळण्यासाठी राज्यात टीएमएस २.० (ट्रांझॅक्शन मॅनेजमेंट सिस्टिम) प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. सोमवारी मध्यरात्रीनंतर कार्यप्रणाली सुरू होताच पहिल्या तासात जिल्ह्यातून ६ रूग्णांनी नोंद केली. या प्रणालीमुळे रुग्णांकरिता पारदर्शक, जबाबदार आणि सुलभ ठरणारी आरोग्य व्यवस्था निर्माण होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत राज्यातील ४ हजार ५३७ रुग्णालयांमध्ये २ हजार ३९९ मोफत उपचारांचा ऑनलाइन पद्धतीने शुभारंभ सोमवारी करण्यात आला आहे. योजनेत अकोला जिल्ह्यात ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रांसह एकूण ८१ रूग्णालये योजनेत समाविष्ट आहेत.

## निधनवार्ता

**संदीप पाटील**



**हिवरखेडः** प्रभाग क्रमांक २ मधील रहिवासी संदीप पाटील यांचे मंगळवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

# बलोदे लेआउट मध्ये सकल हिंदू संमेलन




प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोला :** रविवारी गायत्री प्रभात संघ शाखेतर्फे गजानन महाराज मंदिर, बलोदे लेआऊट येथे परिसरातील सकल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले. , संमेलनाला परिसरातील भगिनी व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष खटोड गुरुजी, सौ. लताताई राठोड, विश्व मांगल्य सभेच्या सौ. सोनियाजी तराळकर, प्रशांत महाराज ताकोते व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रुपेश शहा मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात उपस्थितांचे हस्ते दीप प्रज्वलन करून बजरंग गवई यांचे लव्ह जिहाद विरोधातील गीताने करण्यात आली. सौ. लताताई राठोड यांनी स्त्री शक्तीचे महत्व विषद केले. सौ.सोनायाजी तराळकर यांनी मातृ शक्तीचे महत्व व जिचे आचरणाने प्रेरणेने देशभक्त नागरिक निर्माण होतात मातृ शक्ती एक शक्तीपीठ असल्याचे विषद केले. प्रशांत महाराज ताकोते यांनी हिंदू समाजाने संघटित होऊन कार्य करण्याचे आवाहन केले. रुपेश शहा यांनी बंदूक घेऊन सीमेवर न जाता भारतमातेची सेवा समरसता, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी,पर्यावरण व नागरिक शिष्टाचाराचे दैनंदिन जीवनात आचरणात स्वीकार करून प्रत्येक नागरिक करु शकतो असे सांगितले. संमेलनाचे संचालन श्याम कुलकर्णी व आभार प्रदर्शन मुरलीधर काळे यांनी केले.

# डॉ. भाग्यश्री चौधरी यांना आचार्य पदवी बहाल



प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोट :** मंचनपुर सावरा गावांमधील रहीवासी संतोष चौधरी यांची कन्या डॉ. भाग्यश्री हिला नुकतेच संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथे कुलगुरू यांच्या हस्ते प्राणीशास्त्रात आचार्य पदवी बहाल करण्यात आली.

डॉ भाग्यश्री चे डीग्री पर्यतंचे शिक्षण अकोट येथील शिवाजी महाविद्यालय येथे झाले. तिला मिळालेल्या यशाचे सर्व स्तरांमधून कौतुक होत आहे.तर शिवाजी महाविद्यालय अकोट येथेही तीचा मान्यवरांचे उपस्थीतीत सत्कार करण्यात आला भाग्यश्री ची डिग्री म्हणजे चौधरी परिवाराचा अभिमान आहे तिच्या यशाचे गावकऱ्यांनीही अभीनंदन केले.

# माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी स्नेह संमेलन



प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोट :** सावरा येथे ९५/९६ बॅचच्या विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन झाले. प्रफुल धांडे व पूनम धांडे यांनी व्हाट्सअप ग्रुप तयार केला. सविता चौधरी, ज्योती तायडे, सुवर्णमाला चौधरी, प्रशांत धांडे,नितीन चौधरी, सतीश अडोकार, दिनेश बोदळे, अतुल मंगळे, शिवाजी टोलमारे यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे नियोजन दीपक राऊत यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक लालजी विठोबापंत सपकाळ यांच्या फोटोचे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज सावित्रीबाई फुले तसेच महापुरुषांचे पूजन करून करण्यात आली. डोसे यांनी पूर्वीप्रमाणेच राष्ट्रगीत घेऊन पूर्वीप्रमाणेच दहाव्या वर्गात आपापल्या टेबलवर बसण्याच्या सूचना दिल्या. माजी मुख्याध्यापक सौ. शैलेजा साळकर ( कोठीकर) यांनी सर्व विद्यार्थी व विद्यार्थ्यांची दहाव्या वर्गात हजेरी घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्याध्यापक एस. एस.निखाडे तसेच प्रमुख पाहुण्यांमध्ये संतोष सपकाळ यांची उपस्थिती लाभली. माजी मुख्याध्यापक मदन खैरे, अनंत लंके , गजानन डोसे ,पाथ्रीकर,मेंढे, संजय दोड तसेच चेतन चौधरी, टोलमारे मॅडम, हेंड मॅडम, मनोज काळे, भिकाजी काटोले यांची उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमा मध्ये सर्व माजी विद्यार्थ्याकडून लाडक्या बहिणींना आठवण म्हणून साडी भेट दिली.

# नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**अडगांव बु. :** येथील श्री महासिद्धेश्वर मंदिर संस्थानच्या वतीने महाशिवरात्रीच्या पर्वावर १५ ते २३ फेब्रुवारी पर्यंत शिवपुराण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यात्मिक सोहळ्याची सांगता काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने करण्यात आली. त्यानिमित्त भक्तीच्या या वातावरणात सामाजिक बांधीलकी जपण्याच्या उद्देशाने डोळे तपासणी शिबिरा'चे आयोजन संस्थानच्या वतीने करण्यात आले होते, अकोला येथील प्रसिद्ध डॉ. गुलवाडे हॉस्पिटलच्या सहकार्याने नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये डॉ. अतुल इंगळे, डॉ. सोनम तेलगोटे आणि सिरसाट मॅडम यांच्या तज्ज्ञ पथकाने शेकडो रुग्णांची तपासणी केली. सोहळा आणि आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी महासिद्धेश्वर संस्थान चे कार्यकर्ते नामदेवराव धुळे, शहादेव रेळे, ओंकार निमकडे, मसूरकर महाराज, किशोर रेळे, प्रविण साखरे, संतोष बाजोड, विठ्ठल गावंडे आणि सुरज झुने यांनी परिश्रम घेतले.

# समाजसेवक व आदर्श सुनांचा गौरव

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी




बाळापूर : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त येथे 'मानवतेचा सन्मान' व 'आदर्श सून सन्मान' सोहळा रविवारी पार पडला. अध्यक्षस्थानी गुरुदेव सेवा मंडळ, मोझरीचे आजीवन प्रचारक शुकदास महाराज गाडेकर होते. प्रमुख पाहुणे आमदार अमोल मिटकरी, स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. रेखा पाटील आणि बाळापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बंडूनाना पजई उपस्थित होते. कवी सत्यसागर अवचार यांनी कविता सादर केली. प्रास्ताविक ॲड. मुरलीधर राऊत, संचालन गणेश पाथरीकर यांनी केले, तर आभार माधव घोगरे यांनी मानले.

यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य नरहरी बोरसे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर नीता बिडवे, संतोष पाचपोर, माया खत्री आणि संगीता ठोंबरे यांचा सन्मान करण्यात आला. इंदोरे यांच्या संकल्पनेतून हरिदिनी इंगळे पारस, शिला मांगटे पाटील, पूजा घाडगे, विद्या दळवी आणि कस्तुराबाई चोरे यांना 'आदर्श सून' म्हणून गौरविण्यात आले. बाल शिवव्याख्याते राम थेटे व पूजा थेटे यांनी व्याख्यान दिले.

# अकोली जहागीरला शिवजयंती साजरी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**अकोट :** अकोली जहांगीर येथे येथे शिवजयंती महिला, उपसरपंच पंकज ढेंबरे यांच्या पुढाकाराने उत्साहात साजरी झाली. महिला भजन मंडळाने महाराजांची पालखी काढण्यात आली. तसेच गावातील लहान मुलींनी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटीका गावातील चौका चौका मध्ये विशेष वेशभूषा सादर करून विद्यार्थिनींनी विशेष रोडवर वेगवेगळे सादरीकरण आकर्षण पथनाट्य सादर करत प्रेक्षकांची डोळ्यांचे पाहण्याचे पारणे फेडले व विविध कला मंच सादरीकरण केली.

यावेळी गावातील मान्यवर ज्येष्ठ नागरिक तथा तरुण पिढी व महिलांच्या मोठ्या संख्येच्या पुढाकारात या शिवजयंती उपक्रमाला गावामध्ये मुख्य रोडवर ठीक ठिकाणी महाराजांच्या पालखीचे पूजन करण्यात आले पालखी मिरवणुकीमध्ये महाराजांचा जय घोष मोठ्या प्रमाणात आवाज गुणगुणत होता परिसराला भगवे झेंडे भगवे मय वातावरण तयार झाले होते पालखीचे आकर्षण महिलांनीच पालखी खांद्यावर घेत संपूर्ण गाव प्रदक्षिणा काढण्यात आली महिलांच्या या स्तुत्य उपक्रमाला गावकऱ्यांकडून प्रचंड प्रतिसाद कौतुकाची थाप पाहायला मिळाली

मंडळाचे अध्यक्ष पंकज ढेमरे, गोपाल गयधर, अमोल खन्नाडे, आशिष खन्नाडे, देवानंद गोठवाड, संजय निमकाळे, विनोद धर्मे, संजय माकोडे, माधुरी घोडीले, किशोर गयधर, दुर्योधन भेले,दीपक गयधर,रोशन ढोले, ऋषिकेश बघेले, अतुल कंसरे, विजु कंसरे, गोपाल बोरोडे, गणेश पटेल, सुमित धर्मे, विजु धर्मे तसेच गावातील इतर माण्यवर उपस्थित होते.यावेळी गावातील लोकांनी ठीक ठिकाणी चहा पाण्याची व्यवस्था केली होती.

# जगन बगाडे यांचा कापूस लागवड तंत्रज्ञानात उल्लेखनीय कामगिरीबद्दल खा. धोत्रे यांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी




**अकोट :** एचडीपीएस कापूस लागवड तंत्रज्ञानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तालुक्यातील खापरवाडी येथील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कृषी विज्ञान केंद्र येथे गौरव सोहळा पार पडला.

कापूस लागवड तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रगतशील शेतकरी जगन प्रल्हाद बगाडे यांचा खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. सधन कापूस लागवड कमी जागेत जास्त उत्पादकता देणाऱ्या या तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात बदल घडवणाऱ्या शेतकऱ्यांचे खासदार अनुप धोत्रे यांनी भरभरून कौतूक केले. कृषी विज्ञान केंद्र यांनी उपक्रमाचे यशस्वी नियोजन केले होते. या तंत्रज्ञानामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मोठी मदत होत असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या पद्धतीचा अवलंब करावा असा सूर या कार्यक्रमात उमटला. यावेळी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात गाडगे महाराज यांना अभिवादन

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**अकोटः** संत गाडगे महाराज यांना २३ फेब्रुवारी रोजी जयंती निमित्त रुईखेड येथे श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले.

सर्वप्रथम त्यांच्या प्रतिमेस हारअर्पण व पुष्पाअर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाला मार्गदर्शन व संत गाडगे महाराज यांनी केलेल्या कार्यावर संतोष काळे व किरण मानकर यांनी प्रकाश टाकला .

विद्यार्थी प्रिया पिंपळकर हिने संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. सदर कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक निनाद मानकर,अनिता भराटे,किरण मानकर,वनिता सरोदे,संतोष काळे,विशाल मांडवे,मंजुषा साठे,अनिल ओखारे,प्रा.रूपेश गायगोले,प्रा.राहुल खंडारे,संगीता पन्नासे,संगीता नाथे,जानव्ही गाठेकर ,शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके,गजानन घुगे,अविनाश सुकोशे व विद्यार्थी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# तडजोड नाकारने जिवावर बेतले; तरुणाचा निर्घृण खून

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** कळंब तालुक्यातील दोनोडा गावात जुन्या वादातून एका तरुणाची कुऱ्हाडीने हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी २४ फेब्रुवारी रोजी घडली. तडजोड करून गुन्हा मागे घ्यावा, या दबावातून हा खून झाल्याची प्राथमिक माहिती असून आरोपी बाप–लेक फरार झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात भीती व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दत्ता उर्फ अविनाश केशव चौधरी (वय ३३, रा. दोनोडा) असे मृताचे नाव आहे. आशिष मारोती करलुके (वय ३३) आणि त्याचे वडील मारोती करलुके (वय ५५) यांच्याविरुद्ध कळंब पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे सहा वर्षांपूर्वी दत्ता व आशिष यांच्यात झालेल्या वादातून आशिषने दत्तावर प्राणघातक हल्ला केला होता. त्या घटनेत दत्ता गंभीर जखमी होऊन अपंग झाला होता. या प्रकरणी आशिषविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल झाला होता. सध्या आशिष पोलीस भरतीची तयारी करत असल्याने अंगावर असलेला जुना गुन्हा अडचणीचा ठरेल, अशी त्याला भीती होती. त्यामुळे संबंधित गुन्हा मागे घेण्यासाठी त्याने दत्तावर वारंवार 'आपसी' घेण्याचा दबाव टाकल्याचे सांगितले जाते. मात्र दत्ताने तडजोडीस स्पष्ट नकार दिला होता. सोमवारी रात्री दत्ता आणि मारोती करलुके यांच्यात किरकोळ बाचाबाची झाली. ही माहिती मिळताच मंगळवारी सकाळी सुमारे ९ वाजता आशिष दोनोडा येथे आला. गावातील पानटपरीजवळ उभ्या असलेल्या दत्तावर आशिष व त्याच्या वडिलांनी कुऱ्हाडीने सपासप वार केल्याची माहिती आहे. डोक्यावर व शरीरावर गंभीर जखमा झाल्याने दत्ता रक्तबंबाळ अवस्थेत कोसळला. त्याला तातडीने कळंब येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती मृत घोषित केले. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

मृताचे वडील केशव चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. ठाणेदार राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक आरोपींचा शोध घेत आहे.

## दिव्यांग शिक्षकांच्या प्रमाणपत्र पडताळणीसाठी २६ फेब्रुवारीला सुनावणी

### दिव्यांग प्रमाणपत्र व UDID कार्डसह उपस्थित राहणे अनिवार्य

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जिल्ह्यातील २९५ दिव्यांग शिक्षकांना येत्या २६ फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्ती, पदोन्नती तसेच विविध शासकीय सवलतींचा लाभ घेणाऱ्या शिक्षकांच्या दिव्यांगत्व प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी ही सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद, यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत शिक्षण विभाग (प्राथमिक) कडून याबाबतचे पत्र सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे.

त्यानुसार पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व दिव्यांग शिक्षकांना २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व पदोन्नती प्रक्रियेत काही महत्त्वाच्या तरतुदी नमूद करण्यात आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) सादर केले आहे की नाही, तसेच त्यातील दिव्यांगत्वाची टक्केवारी व प्रकार यांची खातरजमा करण्यासाठी प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

जिल्ह्यातील अस्थिव्यंग, अल्पदृष्टी, अंध व कर्णबधिर अशा विविध प्रकारच्या दिव्यांगत्व असलेल्या शिक्षकांचा या यादीत समावेश आहे. प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या या शिक्षकांनी संबंधित दिव्यांग प्रमाणपत्र आणि UDID कार्डसह अनिवार्यपणे उपस्थित राहावे, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. सुनावणीच्या दिवशी कोणीही अनुपस्थित राहू नये, याची दक्षता गटशिक्षणाधिकाऱ्यांनी घ्यावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रक्रियेमुळे दिव्यांग शिक्षकांमध्ये काही प्रमाणात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, प्रशासनाच्या म्हणण्यानुसार ही कार्यवाही शासन निर्णयानुसार नियमित पडताळणीचा भाग असून पात्र लाभार्थ्यांना सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, यासाठीच हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

सदर प्रकरणाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर करण्यात आली आहे. सुनावणीनंतर पुढील प्रशासकीय निर्णय घेतले जाणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

## चाईल्ड हेल्पलाईन : चार बालविवाह रोखले

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** नववर्षाच्या सुरुवातीलाच यवतमाळ जिल्ह्यात चार अल्पवयीन मुलींचे नियोजित बालविवाह चाईल्ड हेल्पलाईन १०९८ व जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या माध्यमातून यशस्वीरीत्या रोखण्यात आले. या प्रकरणांमध्ये यवतमाळ तालुक्यातील वाघाडी, नेर तालुक्यातील रत्नापूर बेडा, बाभूळगाव तालुक्यातील गणोरी आणि महागाव तालुक्यातील पिंपळगाव इजारा येथील बालविवाहांचा समावेश आहे. मागील वर्षभरात १०९८ हेल्पलाईनवर ६० पेक्षा अधिक बालविवाह संदर्भातील कॉल प्राप्त झाले होते. तातडीने घटनास्थळी भेट देऊन स्थानिक प्रशासनासोबत समुपदेशन केले गेले. विवाहासाठी मुलाचे किमान वय २१ वर्षे तर मुलीचे १८ वर्षे असणे आवश्यक असून, अल्पवयीन मुलींचा विवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंतर्गत दोन्ही पालकांना दंड आणि दोन वर्षांपर्यंत कैद होऊ शकते.ही कारवाई जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे विधी व निरीक्षक महेश हळदे, चाईल्ड हेल्पलाईन सुपरवायझर मनीष शेळके, पूनम कनाके, गणेश आत्राम, केस वर्कर पूजा शेलारे, अश्विनी नासरे, शुभम कोंडलवार व स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने पार पडली. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव यांनी पालकांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती देत, मुला–मुलींचे वय पूर्ण झाल्यावरच विवाह करण्याचे आवाहन केले. बालविवाहाबाबत माहिती असल्यास २४ तास कार्यरत १०९८ हेल्पलाईनवर संपर्क साधावा; माहिती गोपनीय ठेवली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## कालेश्वरमध्ये वादळाचा तडाखा; घरांची छप्परे उडाली, शेतीचे नुकसान







प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**घाटंजी :** तालुक्यात सोमवारी दुपारी सुमारे चारच्या सुमारास आलेल्या अचानक वादळ-वाऱ्यासह पावसाने पारवा परिसरातील कालेश्वर गावाला जोरदार तडाखा दिला. काही मिनिटांच्या या नैसर्गिक आपत्तीने गावातील अनेक घरांची टिनाची छप्परे उडाली असून वीज वितरणाच्या डीपीसह काही खांब कोसळल्याने मोठे नुकसान झाले आहे.

कारवाईपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या आदिवासी बहुल कालेश्वर गावात वादळाने अक्षरशः धुमाकूळ घातला. अनेक घरांचे टिनपत्रे उडून गेल्याने कुटुंबीयांना उघड्यावर येण्याची वेळ आली. गावातील काही भागात वीजपुरवठा खंडित झाला असून नुकसानग्रस्त कुटुंबांना तात्पुरत्या निवाऱ्याची गरज निर्माण झाली आहे.

> ■ वादळासोबत झालेल्या पावसामुळे शेतीचेही मोठे नुकसान झाले. गहू व हरभरा ही काढणीस आलेली पिके जमिनीवर आडवी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. "तोंडात आलेला घास हिरावला गेला," अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

मंगळवारी घाटंजी तहसील कार्यालयाकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी नुकसानग्रस्त घरांची व शेतीची पाहणी करून पंचनामा करण्यास सुरुवात केली आहे. शासनाकडून योग्य ती नुकसानभरपाई मिळेल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

दरम्यान, आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या आदिवासी व मजूर कुटुंबांवर या आपत्तीमुळे दुहेरी संकट ओढवले आहे. तातडीची मदत व वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## ट्रकच्या धडकेत महिला गंभीर जखमी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** शहरातील संविधान चौकात आज सकाळी सिग्नलवर उभ्या असलेल्या ॲक्टीवा दुचाकीला भरधाव ट्रकने धडक दिल्याने महावितरण कार्यालयातील महिला कर्मचारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, मयुरी रुपेश पाटील (वय 34, रा. राऊतनगर) या महावितरण कार्यालयात कनिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. त्या दररोजप्रमाणे आज सकाळी ॲक्टीवा (क्र. MH/27 BR/8830) या दुचाकीने कार्यालयाकडे जात होत्या. संविधान चौकात सिग्नल बंद असल्याने त्या थांबल्या असताना त्यांच्या शेजारी उभ्या असलेल्या ट्रक (क्र. MH/29/BE-0505) चालकाने सिग्नल सुरू होताच निष्काळजीपणे वाहन पुढे घेतले. यावेळी ट्रकने ॲक्टीवालाच घासत नेल्याने पाटील या खाली पडल्या.

## रेमंड कामगारांचे उपोषण; आमदार मांगुळकर यांची मंत्री फुंडकर याच्यासोबत चर्चा

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** काल मुंबईत महाराष्ट्र राज्याचे कामगार कल्याण मंत्री आकाश फुंडकर यांची यवतमाळ विधानसभा मतदार संघाचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी भेट घेतली. या



बैठकीदरम्यान रेमंड कंपनी कामगारांच्या प्रलंबित मागण्या, वेतन व इतर हक्कांचे प्रश्न यावर सविस्तर चर्चा झाली. आमदार मांगुळकर यांनी मंत्री महोदयांना सांगितले की कामगारांच्या न्याय्य मागण्यांकडे तातडीने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी ही मागणी केली की कंपनी प्रशासन आणि कामगार प्रतिनिधींमध्ये त्वरित बैठक आयोजित करून सामंजस्याने मार्ग काढावा, जेणेकरून कामगारांना न्याय मिळेल आणि कंपनीचे काम सुरळीत चालू राहील. यावेळी आमदारांनी नमूद केले की कामगारांचे हित अबाधित राहावे आणि उद्योगही नियमित चालू राहावा, यासाठी शासनाने सकारात्मक हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. तसेच कंपनी प्रशासन आणि कामगार यांच्यात संवाद वाढवून त्वरित उपाययोजना करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली. बैठकीदरम्यान कामगारांच्या मागण्या न्याय्य असून, त्यावर तातडीने निर्णय घेणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले. या भेटीमुळे कामगारांचे प्रश्न योग्य मार्गाने सोडविण्यास एक महत्त्वाचा टप्पा साधला जाईल, असा विश्वास आमदारांनी व्यक्त केला.

## पीक विमा धोरणावर शेतकऱ्यांचा संताप; भरपाईअभावी आर्थिक कोंडी तीव्र

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**उमरखेड :** केंद्र व राज्य शासनाच्या गाजावाजात सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री फसल बीमा योजना (पीक विमा योजना) संदर्भातील धोरण शेतकऱ्यांसाठी फसवे ठरत असल्याचा आरोप होत आहे. प्रीमियम भरूनही पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची विमा रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

खरीप हंगाम २०२५-२०२६ पासून योजनेत करण्यात आलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे नाममात्र हप्ता न भरता प्रती हेक्टर मोठी रक्कम प्रीमियम म्हणून जमा करावी लागली. मात्र नुकसानभरपाईच्या वितरणाबाबत विलंब होत असल्याने शेतकरी ताटकळत बसल्याचे चित्र आहे. विमा कंपनी व शासनाकडून वेळकाढूपणा केला जात असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. मागील खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे शेती व पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये नुकसानग्रस्त व पीक विमा भरलेल्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टर १७,५०० रुपये विमा भरपाई देण्याची घोषणा केली होती. मात्र दीर्घ कालावधी उलटूनही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नसल्याचा आरोप केला जात आहे. आधीच नापिकी, वाढती उत्पादनखर्च आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. अशा परिस्थितीत विमा रक्कम वेळेत मिळाली तर आत्महत्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, अशी प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत. दरम्यान, संबंधित विमा कंपन्या व प्रशासनाने तातडीने प्रलंबित दावे निकाली काढून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## लोणबेहळमध्ये मिथुन तोडसाम चर्चेत; पं. स. निवडणूक लढवण्याची तयारी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**आर्णी :** लोणबेहळ येथील सामाजिक कार्यकर्ते मिथुन



किसन तोडसाम हे आपल्या सातत्यपूर्ण समाजाभिमुख कार्यामुळे सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहेत. गावातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी ते नेहमी पुढाकार घेत असल्याने नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. गरजू कुटुंबातील विवाह सोहळ्यांना आर्थिक मदत, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फी सहाय्य, तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग अशा माध्यमातून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दिवस-रात्र नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर असणारे कार्यकर्ते म्हणून त्यांना ओळखले जाते. याच पार्श्वभूमीवर लोणबेहळ–देउरवाडी (बु) पंचायत समिती सर्कल निवडणुकीत मिथुन तोडसाम यांनी उमेदवारी जाहीर करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत असल्याची चर्चा आहे. त्यांच्या सामाजिक कार्याच्या बळावर ते निवडणूक रिंगणात उतरल्यास त्यांना व्यापक पाठिंबा मिळू शकतो, असा विश्वासही व्यक्त केला जात आहे. दरम्यान, तोडसाम यांनी अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नसली तरी परिसरातील राजकीय घडामोडींना त्यांच्या निर्णयाची उत्सुकता लागली आहे.

## धामणगाव देव येथे माऊलीचा जयघोष

### पालकमंत्री संजय राठोड यांनी केले अभिवादन

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**यवतमाळ :** श्री मुंगसाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त धामणगाव देव येथील श्री मुंगसाजी महाराज संस्थान परिसर भक्तिभावाने उजळला. यावेळी महाराष्ट्राचे पालकमंत्री संजय राठोड उपस्थित होते. त्यांनी माऊलींच्या समाधीला अभिवादन करून आशीर्वाद घेतले.

मंत्रोच्चार, विधीवत आरती आणि भक्तिमय वातावरणात पालकमंत्र्यांनी माऊलींच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण केली. मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होती आणि ढोल-ताशांच्या गजरात भक्तांनी "माऊलींच्या जयघोषात" वातावरण भक्तिमय केले. पालकमंत्र्यांनी सांगितले, "माऊलींच्या विचारांत समाजाला एकत्र ठेवण्याची



आणि संस्कार जपण्याची ताकद आहे." यावेळी पारंपरिक पालखी सोहळ्यातही पालकमंत्री सहभागी झाले. सजविलेल्या पालखीचा मान स्वीकारून भक्तांसोबत काही अंतर पायी चालत त्यांनी सहभाग नोंदविला. दोन दिवसीय महोत्सवात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. काल झालेल्या 'महाराष्ट्र गौरव गाथा' कार्यक्रमात लोककला, भक्तिगीते आणि सांस्कृतिक नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या शेवटी पालकमंत्र्यांनी संस्थानच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून तीर्थक्षेत्राच्या विकासाबाबत सूचना घेतल्या व शासनस्तरावर आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यांनी मुंगसाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शिकवणी समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. "सर्व भक्तांच्या जीवनात सुख, समृद्धी व शांती नांदो," अशी प्रार्थना त्यांनी केली.

उपविभागीय अधिकारी सूर्यवंशी साहेब, तहसीलदार, गटविकास अधिकारी-बांधकाम, संस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त, मुख्य पुजारी तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. संपूर्ण परिसर श्रद्धा, भक्तिभाव आणि उत्साहाने परिपूर्ण होता.

## जि.प.-पं.स.वर काँग्रेसचा झेंडा फडकवणार

### खा.प्रतिभा धानोरकर यांचा निर्धार; आर्णीतील मेळाव्यात महायुतीवर जोरदार हल्लाबोल

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**आर्णी :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आर्णीत झालेल्या काँग्रेसच्या भव्य कार्यकर्ता मेळाव्यात सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका करण्यात आली. "नगरपालिकेनंतर आता जिल्हा परिषदेतही परिवर्तन घडवूया. जि.प. आणि पं.स.वर विजयाचा गुलाल उधळल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही," असा निर्धार खासदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केला.




आर्णी येथे झालेल्या या मेळाव्यास कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनीही उपस्थित राहून प्रचाराचे रणशिंग फुंकले. युवक काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन संघटनबांधणीला चालना देण्यात आली.

खासदार धानोरकर यांनी आपल्या भाषणात सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली. "राज्यात महायुतीविरोधात जनक्षोभ वाढत आहे. पराभवाची चाहूल लागल्यानेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाणीवपूर्वक पुढे ढकलल्या जात आहेत," असा आरोप त्यांनी केला. लोकशाही प्रक्रियेला सामोरे जाण्याऐवजी जनतेचा कौल टाळण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी म्हटले.

महिलांसाठी जाहीर करण्यात आलेल्या योजनांवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात लाभार्थ्यांना प्रतीक्षा करावी लागते. कर्जमाफीचाही मुद्दा निवडणुकीआधीच आठवतो," अशी टीका त्यांनी केली.

माजी मंत्री मोघे यांनी आदिवासी व ग्रामीण भागातील प्रश्नांवरून सरकारला धारेवर धरले. "घोषणांचा पाऊस पाडला जातो; पण जल, जंगल, जमीन या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होते. आदिवासींच्या हक्कांच्या योजनांचा निधी वळवला जात असल्याची भावना निर्माण झाली आहे," असे ते म्हणाले. धनगर–आदिवासी वादाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक सलोखा बिघडविण्याचे राजकारण होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

या मेळाव्यास प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आरिज बेग, जिल्हा सरचिटणीस जितेंद्र मोघे, माजी संचालक राजू गावंडे, स्वाती येनडे, अनिल आडे, राजू विरखेडे आदींसह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"एकच जिद्द, एकच ध्यास... काँग्रेसचा विजय हाच विश्वास," अशा घोषणांनी सभागृह दणाणून गेले. आगामी निवडणुकांत प्रत्येक बूथवर संघटन मजबूत करून जिल्हा परिषद व पंचायत समितीत सत्ता मिळवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## अवकाळी पावसाने रब्बी पिके जमीनदोस्त; हेक्टरी ५० हजार भरपाईची मागणी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**उमरखेड :** तालुक्यात २२ व २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या वादळी अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची भरपाई जाहीर करावी, अशी मागणी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली आहे.



ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन शिंदे झाडगावकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना निवेदन पाठवून नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याची मागणी केली आहे. तालुक्यातील चातारी, कारखेड, देवसरी, विडूळ, मुळावा, पिंपळदरी, आडद, धनज, मोहदरी, तीवरंग, झाडगाव, तरोडा, हातला, पार्डी, वानेगाव तसेच बंदी भागातील अनेक गावांमध्ये वादळी पावसासह गारपीट झाली. या आपत्तीत गहू, हरभरा, तीळ, टाळका, केळी, टरबूज तसेच विविध भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आधीच अतिवृष्टी व महापुरामुळे खरीप हंगाम उद्ध्वस्त झाला असताना शेतकऱ्यांची सर्व आर्थिक मदार रब्बी पिकांवर होती. मात्र अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे कृषी विभागामार्फत तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी तसेच पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई देण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी युवा जिल्हाध्यक्ष लोकपाल माने, उपाध्यक्ष शिवाजी पाटील कदम, तालुका अध्यक्ष पवन सूर्यवंशी यांनीही प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचा इशारा दिला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## आता मंत्रालयात आंदोलन




# वाशीम शहरातील नागरिकांचे...

# रस्तेच नव्हे तर जीवनच खड्ड्यात !

## रस्त्याचे प्रकरण सागर कोकास यांनी पोहोचविले मंत्रालयात...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. शहरवासीयांना विविध समस्यांना तोंड घ्यावे लागत आहेत. शिवाय शहरातील रस्तेही १२ वर्षात ५ वेळा होवूनही रस्तेच नव्हे तर नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. मुख्यमंत्री प्रचारासाठी आले असतांना शहरातील रस्ते तातपूर्ते का होईना रातोरात हातोहात दुरूस्त झाले. त्यामुळे मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो सागर कोकास यांनी आंदोलन करून केला होते. या संबंधिचे सर्वप्रथम मुख्यमंत्री साहेब, तुमच्या मुळे तातपुरर्ते रस्ते दुरूस्त असे वृत्त लावून सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम लक्ष वेधले. सागर कोकासच्या आंदोलनाला यश आले असून सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्ताची दखल घेत मुख्यमंत्री गेल्यानंतरही शहरातील मुख्यमार्गाचे काम सुरू झाले होते. अधिवेशनात जावून सर्वांना निमंत्रण दिले. महसुल मंत्री आता बावनकुळे साहेब वाशीमला येवून पाटणी चौक मार्गाने जा अन् छत्रपती शिवाजी महाराजांना हार अर्पण करा असा अर्त टाहो सागर कोकास यांनी केला होता. आता याच रस्त्यासाठी मंत्रालयात पाठपुरावा करून आंदोलन करणार असल्याचे सागर कोकास यांनी सांगितले आहे. या संबंधिचे पत्रही मुख्यमंत्र्यांना दिले आहे.

### समस्यांच्या गर्तेत जीवन जगताहेत वाशिमकर

२८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून रस्त्यांची स्वच्छता झाली, रस्त्यावरील खड्डे बुजविले. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून वाशिम शहारातील प्रत्येक नागरिक दररोज याच खड्ड्यांतून ये-जा करतोय, त्यांची हाडे दररोज खिळखिळी होताहेत. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय दररोज वाशिम ला आल्यास किमान येथील जनतेला चांगल्या सुविधा तरी मिळतील, अशी माफक अपेक्षा सागर कोकास यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर तातपूरर्ते का होईना आता निवडणुकीसाठी दिखावा म्हणून मुख्यरस्त्यावरील कामांना सुरूवात झाली आहे. मात्र, सागर कोकास यांच्या आंदोलनामुळेच हे कामे होत असल्याची चर्चा वाशीम शहरात होती. आताच रस्त्याच्या समस्यांसाठी मंत्रालयात पाठपुरावा सुरू आहे.

### 'सिटी न्युज सुपरफास्ट' चा सततचा पाठपुरावा...

सर्व सामान्यांच्या समस्यांसाठी सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्ट शासन दखल घेईपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असते. त्यामुळेच १३ वर्षात लोकांच्या मनामनातून घराघरात सिटी न्युज सुपरफास्ट पोहोचला आहे. शहरातील विविध समस्यांच्या प्रत्येक विषयांच्या हजारो वृत्त मालिकेची श्रृंखला सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली आहे. शहरातील समस्यांसाठी सदैव प्रथम पुढाकार घेवून समस्या मार्गी लागेपर्यंत शेकडो वृत्तातून वृत्त मालिकेच्या माध्यमातून सततचा पाठपुरावा करीत असल्याने सिटी न्युज सुपरफास्टने जनसामान्यांच्या मनात घराघरात स्थान निर्माण केले आहे. त्याचाच परिणाम म्हणून समस्यांच्या वृत्तांच्या कात्रनाचे बॅनर शहरात आंदोलनाच्या वेळी लागत असतात.

दि २८ नोव्हेंबर २५ रोजी राज्याचे मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून, प्रशासनाने नियोजित मार्गावरील खड्डे तासाभरात बुजविले, जागोजागी स्वच्छता केली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गेल्या कित्येक महिन्यांपासून असलेली समस्या १० मिनीटांत मार्गी लावली, ह्या सर्व बाबी पाहून सागर कोकास हे व्यथित झाले. त्यामुळे सागर कोकास यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे पोस्टर हाती घेऊन, वाशिम करांना होणाऱ्या त्रासाची बाब अधोरेखीत केली. शहराच्या रस्त्याविषयी फक्त सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. मुख्यमंत्री येणार त्या दिवशीच मुख्यमंत्री साहेब तातपूर्ती का होईना रस्ते दुरूस्त, प्रशासन सुस्त, नागरिक त्रस्त या आशयाचे वृत्त प्रकाशित केले होते. आणि विविध समस्यांची जाणीव करून दिली. त्यानंतर सागर कोकास यांनी रस्त्यावर उतरून अभिनोव आंदोलन केले. मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो काढला. त्यामुळे आता निवडणुकीच्या तोंडावर दिखावा म्हणून वाशीम शहरातील कामे तातपुरर्ते का होईना सुरू झाले आहेत. पुसद नाका चौकातील काम, राजेंद्र प्रसाद शाळेमागील काम, बाकलीवाल शाळेसमोरील काम, अशा अनेक रस्त्याचे काम सागर कोकास यांच्या आंदोलनामुळे सुरू झाल्याची चर्चा आहे. मात्र पुन्हा शहरातील सर्वच रस्ते दुरूस्त करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना निमंत्रण देवून पुन्हा खड्ड्याच्या रस्त्यावर या तुम्हच्या मुळे का होईना रस्ते दुरूस्त होतील असे सागर कोकास यांनी आंदोलन केले. वाशिम नगर परिषद निवडणुकीच्या तोंडावर वाशिम शहराचा विकास प्रत्येक राजकीय पक्षांकडून केल्या जातो. मात्र, शहरात





रस्त्यावर पडलेले खड्डे, सांडपाण्याचे व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, टेंपल गार्डनची झालेली दुरावस्था, रखडलेले नाट्यगृह, बंद असलेले पथदिवे, मुख्य शहरात रस्ता नाही, पण जिथे घर नाही अशा भागात सिमेंटचे रस्ते अशा एक नाही, अनेक समस्या वाशिम शहरात आ वासून उभ्या आहेत. २८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वाशिम शहरात आले होते. त्यांनी शहर विकासाची आश्वासने दिली. मात्र, वाशिमकर नागरिक दररोज कुठल्या परिस्थितीत जीवन जगतोय, याची त्यांना कल्पनाच नाही. त्यामुळे सागर कोकस यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन करणारे पोस्टर दाखविले. कारण, गेल्या कित्येक वर्षांपासून रस्त्यावरील खड्डे जसेच्या तसेच आहेत, पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नाही, जागोजागी कचऱ्याचे ढिग साचले, बंद अवस्थेत असलेले पथदिवे आदि समस्यांचा वाशिमकर दररोज सामना करीत आहेत. मात्र, मुख्यमंत्री शहरात येणार असल्यामुळे प्रशासनाने अगदी तासाभरात रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता तयार केला. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय रोज शहरात आले तर, वाशिमकरांना चांगल्या सुविधा तरी मिळतील, या अपेक्षेपोटी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन केले होते.

सागर कोकास यांच्या या आवाहनाच्या शहरातील प्रत्येक मतदाराच्या तोंडी चर्चा सुरू होती. त्यानंतर शहरातील रखडलेल्या कामाला सुरूवात झाली आहे . विविध शहराच्या समस्यांसाठी सागर कोकास हे रस्त्यावर उतरूण नागरिकांना भेट देवून नागरिकांना भेट देवून समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. उद्या महसुल मंत्री चंद्रकांत बावनकुळे प्रचारासाठी वाशीमला येत आहेत. त्यांनी पाटणी चौक मार्गातून जावून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार अर्पण करावा व शहरातील झालेल्या रस्त्याची दुर्दशा पाहावी शहर फिरूण भकास वाशीम शहराचा आढावा घेवून विकास करावा अशी मागणी सागर कोकास यांनी केली आहे.

तर आता पुन्हा शहरातील रस्त्यासाठी मंत्रालयात जावून निवेदन देवून पाठपुरावा सुरू आहे. रस्ते न झाल्यास निधी न मिळाल्यास मंत्रालयासमोरच आंदोलन करण्याचा इशाराही सागर कोकास यांनी दिला आहे.













## थोडक्यात

### य.च.महाविद्यालयात प्रश्न मंजुषा कार्यक्रम



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

स्थानिक यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात दिनांक २३.०२.२०२६ रोजी संत गाडगे बाबा यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल सुर्वे, डॉ.शरद वाघोळे, डॉ.संजय इंगळे, डॉ. ताकतोडे यांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. यावेळी संत गाडगेबाबा यांच्या विचारावर प्रकाश टाकला. 'संत गाडगे बाबा यांनी अंधश्रधा, शिक्षण, स्वच्छता, दारूबंदी यावर प्रबोधनाचे कार्य हायातभर केले' आजही ते विचार समाजाला आवश्यक आहेत. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून मराठी विभाग व रा. से. यो यांच्या संयुक्तवतीने महाविद्यालयात प्रश्न मंच स्पर्धा आयोजित केली होती त्यामध्ये एकूण ५० विद्यार्थांनी आपला सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल सुर्वे, डॉ.प्रमोद देवके, डॉ. ताकतोडे तसेच प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी यांची उपस्थिती दर्शविली.

### य.च.महाविद्यालयात मातृभाषा दिवस

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात दिनांक २१.०२.२०२६ रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस आभासी पद्धतीने श्री चंद्रकांत ठाकरे, माजी अध्यक्ष, जि. प.वाशिम यांच्या मार्गदर्शनात प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ.मिलिंद भिलपवार मराठी विभाग प्रमुख स्व.जे.डी.पाटील सांगडूदकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय दर्यापूर यांच्या अतिथी व्याखानाने घेण्यात आला.

त्याचे आजच्या लोकमाणसाने जतन करणे आवश्यक आहे.हे विचार मिलिंद भिलपवार सर यांनी मांडले.या कार्यक्रमाला मराठी अभयस मंडळ, व महाविद्यालयातील विविध शाखेच्या विद्यार्थांनी ऑनलाईन हजेरी लाभली होती. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे, डॉ.हरिचंद्र बोरकर नवेगाव, डॉ.प्रमोद देवके, डॉ.देविदास भगत.डॉ.साहेबराव पवार, प्रा.डॉ. शरद वाघोळे, मराठी विभाग प्रमुख हे होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्र.डॉ.देवके सर यांनी केले.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य दिशादर्शक होते-ठाणेदार रामकृष्ण भाकडे

### ग्रामीण युवक मंडळांचा स्तुत्य उपक्रम

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील आदर्श ग्राम दस्तापुर येथे १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३८९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



समाजाला दिशादर्शक म्हणून छत्रपती शिवराय महान कर्तुत्व वान होते. दस्तापुर येथील चिमुकल्या मुला मुलींनी छत्रपती शिवरायांच्या जीवनावर वेगवेगळ्या कार्यांचा गुणगौरव केला. असे ठाणेदार राम कृष्ण भाकडे यांनी यावेळी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकून मार्गदर्शक केले. यावेळी माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे , राम पाटील ठाकरे कार्यकारी सदस्य पंजाबराव देशमुख विद्यापीठ यांनी सुद्धा यावेळी उपस्थिती दर्शविली. यावेळी मा. पोलीस पाटील वसंत मुंजे , प्रतिष्ठित नागरिक नामदेव गळवे, कचरू पाटील, सरपंच सौ पिंकी ताई मुंजे, उपसरपंच आनंद आटपडकर, तंटामुक्ती अध्यक्ष श्रीमंत खांडेकर, माजी उपसरपंच विश्वनाथ आटपडकर, संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव रमेश मुंजे, पोलिस कॉन्स्टेबल सागर आटपडकर, पोलिस कॉन्स्टेबल किशोर मारकड तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते संचलन कु. नेहा व कु. निकिता यांनी केले. कार्यक्रमा करिता ग्रामीण युवक मंडळ दस्तापुर यांनी अथक परिश्रम घेतले.

## 'वऱ्हाडी जत्रा' मिनी सरस प्रदर्शनाचे उद्घाटन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायतराज विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित 'वऱ्हाडी जत्रा' मिनी सरस प्रदर्शन दि.२३ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी या पाच दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन दि.२३ फेब्रुवारी रोजी धाबेकर सांस्कृतिक सभागृह येथे उद्घाटन झाले.



कारंजा उपविभागीय अधिकारी तथा परिविक्षाधीन आय.ए.एस. अधिकारी आकाश वर्मा यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले तसेच राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे, कारंजा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पूनम राणे, विस्तार अधिकारी सचिन गटलेवार, जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे, जिल्हा व्यवस्थापक प्रफुल्ल इटाळ, महिला व बाल विकास विभागाचे सुरज जाधव, जिल्हा व्यवस्थापक दत्ता चव्हाण व वर्षा ठाकरे यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना आकाश वर्मा म्हणाले की, ग्रामीण भागातील बचत गटांच्या महिलांच्या उत्पादनांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्या व्यवसायाला अधिक चालना मिळेल. महिलांनी आपल्या उत्पादनाचे प्रभावी मार्केटिंग करणे गरजेचे असून आजच्या काळात डिजिटल मार्केटिंगकडे वळणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे यांनी मनोगत व्यक्त करताना ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने या प्रदर्शनाच्या माध्यमातून पुढाकार घेतल्याचे सांगितले. परिसरातील नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन महिला बचत गटांच्या उत्पादनांची खरेदी करून त्यांचे मनोबल वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले. दि.२३ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनात सुमारे ८० वस्तू विक्रीचे स्टॉल तसेच २० खानावळीचे स्टॉल आहेत. जिल्ह्यातील सुमारे १०० स्वयंसहायता समूहांची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. खाद्यपदार्थ, मसाले, हातमागावरील कापड, ग्रामीण हस्तकला साहित्य आदी विविध वस्तूंसह खाद्यपदार्थांची मेजवानी या प्रदर्शनात उपलब्ध आहे.

## अधिकारी व ठेकेदार चतूर, रस्त्याची दुरूस्ती थातूर-मातूर !

### कुकसा फाटा मांगुळ झनक रिसोड रस्त्यापेक्षा पांधण रस्ता होता बरा



● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

केनवड पासुन येणारा कुकसा फाटा–मांगुळ झनक (नेतंसा) हा मार्ग परिसरातील नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. तहसील कार्यालय, पंचायत समिती तसेच इतर शासकीय कामांसाठी नागरिकांना या रस्त्याचा अवलंब करावा लागतो. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून हा रस्ता अक्षरशः मृत्यूचा मार्ग बनला आहे. या रस्त्याच्या दुरुस्ती कामासाठी कास्तकार फाउंडेशनने वेळोवेळी निवेदन देत सातत्याने पाठपुरावा करत प्रशासनाचे लक्ष वेधले त्यानंतर जिल्हा प्रशासनाने या रस्त्याची दुरुस्ती हाती घेतली परंतु हे काम धातूर्मातुर करत डांबराचा पत्ता नसल्याने हे काम निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याचे दिसत आहे.



'या रस्त्यापेक्षा शेतातील पांधण रस्ता बरा,' अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे. यावर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे कांचन नदीला महापूर आला. त्या महापुरात रस्त्याच्या साईड कडा वाहून गेल्या असून अनेक ठिकाणी तब्बल दहा फूट खोल दरीसारखे खड्डे निर्माण झाले आहेत. रस्ता अरुंद झाला असून संरक्षणाची कोणतीही भक्कम व्यवस्था नाही. याच रस्त्यावरील पुलाला कठडे नसल्याने धोका आणखी वाढला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना सुरक्षारेलिंग नसल्यामुळे वाहन घसरल्यास थेट खाली कोसळण्याची शक्यता आहे.

त्यामुळे हा मार्ग वाहनधारकांसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे. इतके दिवस उलटूनही ना दिशा फलक, ना सूचना फलक लावण्यात आले आहेत. सध्या केवळ खड्ड्यांमध्ये खडी टाकून दबई फिरवण्याचे काम सुरू आहे. डांबराचा ठोस थर नसताना ही तात्पुरती दुरुस्ती किती दिवस टिकणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, या मार्गाची अवस्था बिकट झाल्यानंतर कास्तकार फाउंडेशनने वेळोवेळी निवेदने देत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असले तरी प्रत्यक्षात केवळ धातू-मातूर स्वरूपाचे काम सुरू असल्याची चर्चा आहे. साईड कडांचे भरीव मजबुतीकरण न करता वरवर खडी टाकण्याचा प्रकार सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. रिसोड तहसील व पंचायत समितीच्या अखत्यारीतील या महत्त्वाच्या मार्गाकडे तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी डांबरीकरण, साईड कडांचे मजबुतीकरण, पुलावर कठडे बसविणे व आवश्यक सूचना फलक उभारणे गरजेचे असल्याची मागणी ग्रामस्थ व वाहनधारकांकडून होत आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

## आ.पठाण यांना धमकी; वाय दर्जाची सुरक्षा द्या

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे आमदार साजिद पठाण यांना बिष्णोई लॉरेन्स गँगकडून धमकी मिळाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार पठाण यांना तात्काळ वाय दर्जाची सुरक्षा तसेच एक स्कॉर्टिंग गाडी उपलब्ध करून देण्याची मागणी वाशिम येथील महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

१७ फेब्रुवारी रोजी अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस आमदार साजिद पठाण यांना लॉरेन्स बिश्नोई गॅंग कडून १० कोटीच्या खंडणीची मागणी करण्यात आली . १० कोटी द्या नाहीतर तुझा गेम करू अशी धमकी देखील देण्यात आली आहे. ही घटना गंभीर असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. त्यामुळे आज वाशीम येथील महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी जिल्हा पोलीस



अधीक्षक, वाशिम यांना निवेदन देऊन आमदार साजिद पठाण यांच्या सुरक्षेबाबत तातडीने योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आमदार साजिद पठाण यांना मिळालेली धमकी ही गंभीर स्वरूपाची असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने दखल घेऊन आमदार पठाण यांना वाय दर्जाची सुरक्षा देऊन स्कॉर्टिंग वाहन उपलब्ध करून द्यावे. यावेळी महाविकास आघाडीचे नगरसेवक शेख रशीद(नूर भाई), नगरसेवक साबीर बेग मिर्जा यांच्यासह मजहर अहेमद, अजीमोद्दीन, नईम शाह, अलताफ शाह, शेख आफताब, सय्यद अलीम, मुजाहिद अली, शेख, वाजीद, दाऊद हुसेन, अरबाज खान, शेख अजीज , शेख मतीन, शेख आसिफ , जिया मिर्जा, नसीब मिर्जा, आणि कार्यकर्ते मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# स्थायी समिती सभापतीसह प्रभाग समिती निवड सभा 2 मार्च रोजी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका आयुक्तांनी अकोला महानगरपालिकेच्या स्थायी समिती, सभापती, महिला व बालकल्याण समिती, व सभापती, प्रभाग समिती या पदासाठी निवडणूक घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्याच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयाला विनंती केली होती. सर्व सभापती पदांसाठी निवडणूक घेण्यासाठी विशेष सभा २ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

सभेच्या पीठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. महानगरपालिका, अकोला येथील उक्त सर्व समिती सभापती पदांसाठी निवडणूकीचे कामकाज एकामागे-एक अनुक्रमाने नियमानुसार पार पडणार आहे. यासाठी नामनिर्देश पत्र वाटप बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सका.११ ते सायं.५ वाजेपर्यंत, तसेच नामनिर्देश पत्र गुरूवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी सका.११ ते सायं.५ वाजेपर्यंत अकोला महानगरपालिकेच्या महानगरपालिका सचिव कार्यालय येथे स्विकारण्यात येणार आहे, कृपया संबंधीतांनी याची नोंद घेऊन मनपा प्रशासनास सहकार्य करावे.

◆ स्थायी समिती सभापतीपदी सत्ता पक्षाकडून विजय अग्रवाल यांच्या नावाची चर्चा आहे. कारण स्थायी समिती सभापतीपद देखील महत्त्वाचे आहे. त्यामुळे या पदाकडे लक्ष राहते. त्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत. विषय समिती सभापतींची देखील या महत्त्वाच्या सभेत निवड होणार आहे. या पदावर कोणाची वर्णी लागते. याकडे लक्ष राहणार आहे. इतकेच नाही तर याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. शहर सुधार समिती आणि विरोधी पक्षांमध्ये समिती सभापती निवडीवरून महापालिका सभागृहात रणकंदन होणार की प्रक्रिया सामंजस्याने पार पडणार याची देखील उत्सुकता राहणार आहे. या अनुषंगाने महापालिकेतील अंतर्गत राजकारण येत्या काही दिवसात ढवळून निघेल याबाबत शंका नाही. सत्तापक्ष आणि विरोधक कामाला लागलेले दिसतात.

# मेळघाटातील मजुरांच्या प्रश्नावर युवक काँग्रेस आक्रमक ; नरेगा आयुक्तांना 'काळे फासण्याचा' इशारा

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**चिखलदरा/ धारणी:** मेळघाटातील आदिवासी मजुरांच्या प्रलंबित मजुरीचा प्रश्न आणि प्रशासकीय जाचक अटींविरोधात अमरावती जिल्हा युवक काँग्रेसने आता आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. चिखलदरा व धारणी तालुक्यातील 'मनरेगा' (ईंडिए) मजुरांचे थकीत पेमेंट होळीच्या सणापूर्वी करण्यात यावे आणि नवीन कामांसाठी वर्क कोडची मर्यादा शिथिल करावी, अन्यथा नरेगा आयुक्त व संबंधित यंत्रणेला 'काळे फासण्यात' येईल, असा थेट इशारा युवक काँग्रेसने दिला आहे.

या संदर्भात युवक काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी मेळघाटातील आदिवासींच्या ज्वलंत प्रश्नांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

युवक काँग्रेस ने आपल्या निवेदनाद्वारे होळीपूर्वी मजुरी द्या अशी मागणी केली आहे कारण मेळघाटात होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. मात्र, अद्याप अनेक मजुरांचे पेमेंट थकीत आहे. मजुरांच्या घरात आनंदात सण साजरा व्हावा यासाठी हे पेमेंट तातडीने जमा करावे असे निवेदनात म्हटले आहे , तसेच

**वनविभागाची दडपशाही थांबवा:** वनविभाग आणि व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांकडून वनपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला जात आहे, तो तातडीने थांबवण्यात यावा, अश्या विविध मागण्या यावेळी केल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश महासचिव रीतेश पांडव, नितेश वानखेडे, उत्कर्ष देशमुख, धारणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रोहित पटेल, मेळघाट विधानसभा अध्यक्ष पियूष मालवीय यांच्यासह संदीप मुंडे, ललिता बेठेकर, रामलाल काळे , विकी राठोड, रामदास कासदेकर , कमलेश राठोड, अमित बेलकर, तुषार गायन, शाहाब भाई, जय झारखंडे, शैलेश कासदेकर, पूनाजी मोरे, धनराज आठोले, चितराम सेलुकर, राजेंद्र कासदेकर , दशरथ येवले, अक्षय घुमावरे व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

◆ 'प्रशासनाने मजुरांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. जर होळीपूर्वी मजुरी मिळाली नाही आणि कामांचे मार्ग मोकळे झाले नाहीत, तर युवक काँग्रेस स्टाईलने तीव्र आंदोलन छेडले जाईल.'
- **राहुल येवले,** जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस, अमरावती.

# 'लाडकी बहीण' योजनेतील अनियमितते विरोधात युवक काँग्रेसचे निवेदन

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**अकोट :** मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत केवायसी प्रक्रियेमध्ये होत असलेल्या अनियमितता, आर्थिक शोषण तसेच पात्र महिलांना लाभ न मिळण्याच्या गंभीर समस्येविरोधात जिल्हा युवक काँग्रेस व तालुका काँग्रेसच्या वतीने उपविभागीय अधिकारी अकोट यांना निवेदन देण्यात आले.

प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश महासचिव ?ड. महेश गणगणे यांच्या मार्गदर्शनात, युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद नितोने यांच्या नेतृत्वात देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५००/- आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय असतानाही अकोट उपविभागातील अनेक महिलांना अद्याप लाभ मिळालेला नाही. यामागे केवायसी प्रक्रियेमधील मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अनियमितता कारणीभूत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. युवक काँग्रेसच्या वतीने असे सांगण्यात आले की, सीएसी सेंटर व खाजगी संगणक केंद्रांवर महिलांकडून केवायसी करण्याच्या नावाखाली पैसे घेतले जात आहेत. मात्र पैसे भरूनही केवायसी पूर्ण न होणे, कोणतीही अधिकृत पावती न देणे, तसेच 'केवायसी पूर्ण झाली' असे सांगून महिलांची फसवणूक केली जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. यामुळे गरीब व गरजू महिलांना वारंवार आर्थिक फटका बसत असूनही योजनेचा लाभ मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी युवा काँग्रेसचे विधानसभा उपाध्यक्ष अब्दुल वाजिद, एमएसयूआयचे अभय तेलगोटे, युवक काँग्रेसचे केशव हेंन्ड, आशिष वानखडे, नाज़िम खान आदींसह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. दरम्यान, या निवेदनावर आठ दिवसांच्या आत कार्यवाही न झाल्यास युवक काँग्रेस व तालुका काँग्रेसच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन महिलांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला जलजीवन मिशनचा आढावा

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी




**अकोला :** जिल्ह्यातील नागरिकांना जलजीवन मिशनअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला नळजोडणीद्वारे शुद्ध पाणीपुरवठ्याचे उद्दिष्ट असून, ही कामे पूर्णत्वास जाण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन-जलजीवन मिशन समितीची बैठक जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता नीलेश राठोड यांच्यासह संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते. मिशनमधील उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या अनुषंगाने प्रत्येक योजनेचा सातत्याने पाठपुरावा होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्वंकष प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. यावेळी कार्यकारी अभियंता श्री. राठोड म्हणाले, योजनेत अकोला तालुक्यातील ८९, अकोटमधील १४५, तेल्हारा तालुक्यातील ९६, बाळापूर तालुक्यातील ६५, पातूर तालुक्यातील २८, मूर्तिजापूर तालुक्यातील ७१, बार्शीटाकळी तालुक्यातील २९ अशा एकूण ५२३ गावांचा समावेश आहे. चार जुन्या व ११ नव्या पाणीपुरवठा योजनांतील कामे पूर्ण होत आहेत. अनेक योजनांची कामे ९० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाली आहेत. अंगणवाडी व शाळांना होत असलेल्या पाणीपुरवठ्याबाबतही यावेळी आढावा घेण्यात आला.

# चिखला येथील कथित गैरकृत्यप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**खामगाव :** खामगाव-लोणार तालुक्यातील चिखला येथे घडलेल्या कथित गैरकृत्याच्या घटनेमुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. गावात स्थापित छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या कथित विटंबना व हटविण्याच्या प्रयत्नाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून काही महिलांवर मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी विविध सामाजिक संघटनांनी केली आहे. अखिल भारतीय मराठा महासंघ, हिंदू राष्ट्र सेना, सकल हिंदू समाज तसेच अखिल भारतीय मराठा महासंघ महिला आघाडी यांच्या वतीने आंदोलन छेडण्यात आले. आंदोलकांनी आरोपींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा करावी, तसेच घटनेची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी केली. काही बालकांवरही अत्याचाराचा प्रयत्न झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला असून, संबंधितांवर पॉक्सो, विनयभंग व संघटित गुन्हेगारीसारख्या कठोर कायद्यांन्वये कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांना उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात गावातील काही पदाधिकाऱ्यांसह संबंधितांवर कठोर कलमांन्वये गुन्हे नोंदवून त्वरित अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, ठरावीक मुदतीत कारवाई न झाल्यास खामगाव बंदसह विविध लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या घटनेमुळे दोन समाजांमध्ये तणाव निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने हस्तक्षेप करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# दाहक रंगातील शीतल पळस

इम्रान खान २५ फेब्रुवारी



**आलेगाव :** दाहक रंगात नटलेला पळस होळीच्या दिवसात दिसून येतो. तप्त उन्हाची वातावरणात चाहुल लागलेली दिसते. केशरी-लाल फुले

निसर्गाचा श्रृंगार वाढवतात. प्रत्येक हृदयात वसंत जागवतात. दूर माळरानावर पळस फूले फुललेली दिसतात. पळसाचे गुणधर्म आयुर्वेदात सांगितले आहे. तसेच नैसर्गिक रंगाची उधळण करताना पळसाची फूले उपयुक्त ठरतात. आलेगाव आणि परिसरावर निसर्गाने आधीच उधळण केली आहे. आणि त्या सौंदर्यात भर घालण्याचे काम पळस करीत आहे.

# दुर्गा चौक ते स्टेट बँक मुख्य रस्ता खोदून ठेवला

◆ नालीचे काम रखडले; नागरिकांना मोठा त्रास

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**अकोला :** शहरातील दुर्गा चौक ते स्टेट बँक रामदासपेठ शाखेकडे जाणारा मुख्य रस्ता नाली बांधकामासाठी पूर्णपणे खोदून ठेवला आहे. मात्र, खोदकाम केल्यानंतरही प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. लोकांना फे-याने ये जा करावी लागत आहे.

या मार्गावर नाली बांधण्यासाठी रस्ता संपूर्णपणे उकरण्यात आला. मात्र अनेक दिवस उलटूनही नालीचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही. परिणामी वाहनधारक, पादचारी आणि स्थानिक व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

धुळीचे लोट, खड्डयांमुळे वाहतुकीची कोंडी आणि अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांनी हा प्रकार म्हणजे त्रास देण्याचा नवीन फंडा असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.नालीचे काम तातडीने पूर्ण करून रस्ता पूर्ववत करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे. निधीचा योग्य वापर होत आहे की दुरुपयोग, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात येत आहे.

# मोठी उमरी येथे अनधिकृत बांधकामावर मनपाची कारवाई

◆ अतिक्रमणधारकांना स्वखुशीने बांधकाम काढण्याचे आवाहन

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**अकोला :** शहरातील मोठी उमरी परिसरात मुख्य रस्त्यावर करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर आज मनपा प्रशासनाने कारवाई केली. मंजूर नकाशाव्यतिरिक्त उभारण्यात आलेले बांधकाम तसेच रस्त्यालगतचे किरकोळ अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटवण्यात आले. आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

अकोला महानगरपालिका प्रशासनाने मोठी उमरी येथील मुख्य रस्त्यावरील 'हॉलीडे बार'च्या बाजूला शामराव वाहुरवाघ यांनी मंजूर नकाशाव्यतिरिक्त केलेल्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई केली. तसेच रस्त्यावर करण्यात आलेले अतिक्रमणही हटवण्यात आले.मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने, उपायुक्त विजय पारतवार तसेच पूर्व झोनचे सहायक आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने कारवाई शांततेत पार पडली.मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा ठरणारी अतिक्रमणे संबंधितांनी स्वखुशीने काढून प्रशासनाला सहकार्य करावे, अन्यथा मनपा प्रशासनाकडून ती हटविण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे.या कारवाईत अतिक्रमण निर्मूलन विभागाचे अधिकारी व कर्मचारी, तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# व्हॅलेंटाईन डे निमित्त 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या नाती जपण्याचा उत्सव स्पर्धेचे पुरस्कार वितरण

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी



**अकोला :** व्हॅलेंटाईन डे निमित्त 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या वतीने 'नाती जपण्याचा उत्सव' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. प्रेमाला वय नसते आणि शब्दांनाही सीमा नसते, या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमांतर्गत सहभागी नागरिकांनी आपल्या आयुष्यातील खास व्यक्तीसाठी दोन ओळींमध्ये भावना व्यक्त केल्या होत्या. आई-वडील, जीवनसाथी, मित्र-मैत्रिणी तसेच इतर जिव्हाळ्याच्या नात्यांविषयी व्यक्त केलेल्या भावना वाचकांच्या मनाला स्पर्शून गेल्या.

उपक्रमातील खास आकर्षण म्हणून 'लकी ड्रॉ'चे आयोजन होते. ज्या मध्ये सहभागीपैकी तीन भाग्यवान विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट समूहाचे संचालक पंकज देशमुख, युनिट हेड राजेश निखाडे यांच्या मार्गदर्शनात उपसंपादक विजय चव्हाण, मिलिंद गायकवाड, सुनील पद्मने यांच्या हस्ते प्रथम पुरस्कार सौ. तेजस्विनी प्रवीण वानखडे बुलढाणा, द्वितीय पुरस्कार अमन ठाकूर अकोला, तृतीय पुरस्कार सौ. संध्या बी. बोरकर अकोला व प्रोत्साहन पुरस्कार पंडित राजेश शर्मा अकोला यांना देण्यात आले.

# एसटीच्या विभागीय कार्यालयात महिला कर्मचाऱ्याला व्हॉट्सअॅप मॅसेजने खळबळ

प्रतिनिधी २५ फेब्रुवारी

**अकोला :** एसटी महामंडळाच्या अकोला विभागीय कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्याला सहकारी कर्मचारी व्हॉट्सअप मॅसेज पाठवून त्रस्त करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पीडित महिलेने विभाग नियंत्रकांकडे रितसर लेखी तक्रार दाखल केली आहे.

संबंधित कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी तक्रारदार महिलेने केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एसटी महामंडळाच्या अकोला विभागीय कार्यालयात कार्यरत असलेल्या एका पुरुष कर्मचाऱ्याने पीडित महिला कर्मचाऱ्याला व्हॉट्सअॅपवर मेसेज पाठवून मानसिक त्रास देत होता.

कामाच्या व्यापामध्ये अशा प्रकारचे अशोभनीय मेसेज येत असल्याने पीडित महिला प्रचंड तणावाखाली होती. अखेर या त्रासाला कंटाळून तिने धाडस दाखवत वरिष्ठ स्तरावर दाद मागण्याचा निर्णय घेतला. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी 'महिला अत्याचार निवारण समिती म्हणजे विशाखा समिती कार्यरत असते. पीडित महिलेच्या तक्रारीनंतर आता ही समिती या प्रकरणाची चौकशी कशी करते तसेच विभाग नियंत्रक काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK